AROTE
Dental Clinic
smile more.. live more..



डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ

वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८

उपलब्ध उपचार
- रूट कॅनॉल ट्रीटमेंट
- हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
- वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
- दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
- कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
- लहान मुलांच्या दातांवरील उपचार

पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६





दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर

आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए

Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०६२ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


## थोडक्यात...

### दावोसमध्ये महाराष्ट्राचा महापराक्रम

मुंबई (समर्थ गांवकरी) : विदेशी गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे भारताचे 'खरे गेटवे ऑफ इंडिया' असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोसमध्ये केले. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीत महाराष्ट्राच्या प्रगतीचा पाढा वाचताना, आगामी काळात राज्यात गुंतवणुकीचा महापाऊस पडेल आणि त्यातून तब्बल 35 लाख रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जागतिक स्तरावर महाराष्ट्राची विश्वासार्हता पुन्हा एकदा सिद्ध झाल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. गेल्या दशकात महाराष्ट्राने सातत्याने 10 टक्क्यांहून अधिक विकासदर राखला आहे. याच गतीने राज्याची वाटचाल सुरु राहिल्यास, निर्धारित उद्दिष्टाच्या दोन वर्षे आधीच म्हणजेच 2030 पर्यंत महाराष्ट्र 1 ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याचे उद्दिष्ट गाठू शकेल, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. 10 ते 12 वेगवेगळ्या क्षेत्रांतील उद्योगांशी सध्या समन्वय साधला जात असून, यातून राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळणार आहे.

### मंत्र्यांना सभागृहातील आश्वासनांची 90 दिवसांत पूर्तता करणे बंधनकारक

मुंबई (समर्थ गांवकरी) : विधिमंडळाचे कामकाज अधिक प्रभावी आणि गतिमान करण्यासाठी राज्य शासनाच्या संसदीय कार्य विभागाने सोमवारी (16 जानेवारी) नवीन सुधारित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. मंत्र्यांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता आश्वासन दिल्यापासून 90 दिवसांच्या आत करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच 30 दिवसांत प्रश्नांची उत्तरे देणेही अनिवार्य करण्यात आले असून, याला संबंधित विभाग जबाबदार धरले जाणार आहेत. 1998 सालापासून लागू जुन्या नियमांमध्ये बदल करून आता मंत्रालयीन विभागांना संसदीय प्रश्नांची उत्तरे आणि आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी कडक कालमर्यादा आखून देण्यात आली आहे.

## आधी भाजप नेत्यांकडून शिंदेसेनेची वरिष्ठांकडे तक्रार

मुंबई : (समर्थ गांवकरी)

महानगरपालिकेच्या निकालाने भाजपला सर्वात मोठा पक्ष बनवले असले, तरी महायुतीमधील अंतर्गत कलह आता चव्हाट्यावर आला आहे. "उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमुळे मुंबईत भाजपचे नुकसान झाले असून, त्यांच्या खराब स्ट्राईक रेटचा परिणाम युतीच्या जागांवर झाला," अशी तक्रार राज्यातील भाजप नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वाकडे केली आहे. दुसरीकडे, महापालिकेच्या रणनितीसाठी शिवसेनेकडून राहुल शेवाळे दिल्लीत पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. दिल्लीत शेवाळे यांची भाजप नेत्यांसोबत बैठक होणार आहे. राज्यातील भाजप नेत्यांच्या मते, मुंबईत शिंदेंच्या शिवसेनेची कामगिरी निराशाजनक राहिली आहे. एकनाथ शिंदे यांनी हट्टाने जास्त जागा लढवल्या, पण त्या प्रमाणात यश मिळवता आले नाही. जर भाजपने या जागा लढवल्या असत्या, तर स्वबळावर १०० हून अधिक जागा जिंकता आल्या असत्या, अशी भूमिका या नेत्यांनी दिल्लीत मांडली आहे. मुंबईत भाजपचा स्ट्राईक रेट सर्वाधिक असून त्याखालोखाल उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा क्रमांक लागतो, तर अजित पवार गटाचा स्ट्राईक रेट सर्वात कमी राहिला आहे.



- आता शिवसेनेचे राहुल शेवाळे दिल्ली दरबारी, मुंबई महापौरपदाबाबत वाटाघाटींना वेग

दुसरीकडे, मुंबई महापालिकेचा निकाल लागल्यापासून फोडाफोडीच्या भीतीने शिंदे गटाने आपल्या २९ नगरसेवकांना मुंबईतील एका आलिशान हॉटेलमध्ये ठेवले आहे. भाजप नेत्यांनी शिंदेंच्या या 'हॉटेल पॉलिटिक्स' वरही तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, या राजकीय पेचातून मार्ग काढण्यासाठी आणि सत्तेचा वाटा ठरवण्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे खासदार राहुल शेवाळे दिल्लीत पोहोचले आहेत. तिथे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांसोबत होणाऱ्या बैठकीत महापौरपद आणि पालिकेच्या तिजोरीच्या चाव्या मानल्या जाणाऱ्या 'स्थायी समिती' वर चर्चा होण्याची दाट शक्यता आहे.

## कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरण

# समीर गायकवाडचा मृत्यू

### चार वर्षांपासून जामिनावर होता बाहेर

सांगली : (समर्थ गांवकरी)

जेष्ठ पुरोगामी विचारवंत कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी आणि 'सनातन संस्थेचा' साधक समीर गायकवाड याचा आज सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. सांगलीतील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान त्याने अखेरचा श्वास घेतला. चार वर्षांपासून तो जामीनावर बाहेर होता. गायकवाडच्या मृत्यूमुळे पानसरे हत्या प्रकरणाचा खटला आणि पुढील तपासासमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, समीर गायकवाड सांगलीतील विकास चौक परिसरात आपल्या कुटुंबासह वास्तव्यास होता. सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास त्याला अचानक अस्वस्थ वाटू लागले. प्रकृती वेगाने बिघडल्याने कुटुंबीयांनी त्याला तातडीने सांगलीच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्याने उपचारांना प्रतिसाद दिला नाही आणि मंगळवारी पहाटे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. हृदयविकाराने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज असला, तरी शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे अधिकृत कारण स्पष्ट होईल.

ज्येष्ठ विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्यावर १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूरमध्ये सकाळी मॉर्निंग वॉकवरून परतत असताना अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. या हल्ल्यात पानसरे गंभीर जखमी झाले होते, तर त्यांच्या पत्नी उमाताई पानसरे यांनाही दुखापत झाली होती. उपचारादरम्यान २० फेब्रुवारी २०१५ रोजी गोविंद पानसरे यांचे निधन झाले.

सुरुवातीला या प्रकरणाचा तपास कोल्हापूर 'एसआयटी' कडे होता. मात्र, पानसरे कुटुंबीयांच्या मागणीनंतर मुंबई उच्च न्यायालयाने २०२२ मध्ये हा तपास 'एटीएस' कडे सोपवला. ९ जानेवारी २०२३ रोजी कोल्हापूर सत्र न्यायालयाने





समीर गायकवाड, डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, अमोल काळे, शरद कळसकर यांच्यासह १० संशयितांवर हत्येचा कट रचणे आणि हत्या करणे याप्रकरणी आरोप निश्चित केले होते. या प्रकरणातील सर्व १२ संशयितांना सध्या न्यायालयाने जामीन मंजूर केलेला आहे. खटल्याची प्रक्रिया सुरू असतानाच आता मुख्य संशयित समीर गायकवाडचा मृत्यू झाला आहे.

गोविंद पानसरे हे 'शिवाजी कोण होता?' या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक आणि खंदे पुरोगामी नेते होते. त्यांच्या हत्येचा खटला सध्या न्यायालयात सुरू आहे. तपास यंत्रणांच्या मते, समीर गायकवाड हा या संपूर्ण कटातील अत्यंत महत्त्वाचा दुवा होता. त्याच्या माध्यमातून या हत्येमागील मुख्य सूत्रधार आणि इतर आरोपींपर्यंत पोहोचण्याचे मोठे आव्हान यंत्रणांसमोर होते. आता समीरच्या निधनामुळे या प्रकरणातील तपासाची साखळी खंडित होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## SC चा एक निर्णय अन् शिंदे गट भाजपत विलीन होईल

### शिंदेंचे नेते ठाकरेंकडे परत जातील, मूळ शिवसेना अधिक ताकदवान होईल - सरोदे

मुंबई : (समर्थ गांवकरी)

शिवसेना नाव व धनुष्यबाण या पक्षचिन्हावर उद्या सुप्रीम कोर्टात सुनावणी होणार आहे. वकील असीम सरोदे यांनी उद्याच्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने एकनाथ शिंदेंकडून पक्ष व पक्षचिन्ह काढून घेतले तर तर त्यांचे महत्त्व कमी होऊन उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील मूळ शिवसेना अधिक बलवान होणार असल्याचा दावा केला आहे. विशेषतः शिवसेनेचे मॅटर सुप्रीम कोर्टात 37 व्या क्रमांकावर असल्यामुळे ते सुनावणीसाठी रिच होणे कठीण असल्याचेही ते यावेळी म्हणालेत. त्यामुळे उद्या सुप्रीम कोर्टात या प्रकरणी सुनावणी होणार किंवा नाही याविषया साशंकता आहे.

शिवसेना पक्षाचे नाव व धनुष्यबाण या निवडणूक चिन्हावर उद्या सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी सुरू होणार आहे. या प्रकरणी सलग 2 दिवस युक्तिवाद ऐकून घेतले जाणार आहेत. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ या महत्त्वपूर्ण प्रकरणावर सुनावणी घेणार आहे. नोव्हेंबरमध्ये झालेल्या सुनावणीवेळी न्यायालयाने उद्यापासून सुरू होणारी सुनावणी अंतिम असल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे आता हे प्रकरण लवकरच निकाली निघणार हे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर असीम सरोदे यांनी एका पोस्टद्वारे या खटल्यावर प्रकाश टाकला आहे.

असीम सरोदे म्हणाले, शिवसेना नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह. सुनावणीची तारीख उद्या सुप्रीम कोर्टात आहे, पण 37 नंबरचे मॅटर सुनावणीसाठी reach होणे कठीण आहे. आता लोकांचा नवीन प्रश्न - जर एकनाथ शिंदेंकडून पक्ष चिन्ह व शिवसेना नाव काढून घेतले तर मुंबई महापालिकेत काय होईल? मला वाटते शिंदेसेना भाजपमध्ये विलीन होईल व एकनाथ शिंदे यांचे राजकीय महत्व एकदम कमी होईल. शिंदेसेनेतील अनेकजण उद्धव ठाकरेंकडे स्वगृही परत जातील व मूळ शिवसेना अधिक ताकदवान होईल. उद्धव आणि राज ठाकरे मिळून मुंबई महापालिकेतील राजकारण फिरवू शकतील. सर्वोच्च न्यायालयातील एका निर्णयामुळे सुरु झालेला खेळ सर्वोच्च न्यायालयाच कधीतरी संपवेल, असे असीम सरोदे यांनी म्हटले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे असीम



सरोदे यांनी महापालिका निवडणुकीच्या निकालावर भाष्य करतानाही सुप्रीम कोर्टाच्या अपात्रतेसंबंधीच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली होती. ते म्हणाले होते, महापालिका निकालांमुळे पुन्हा एकदा सुप्रीम कोर्टाच्या अपात्रतेबाबतच्या निर्णयाची आठवण झाली. सर्वात प्रथम एक निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला कि राज्यपाल भगतसिंग यांनी बहुमत चाचणीसाठी दिलेला आदेश आम्ही थांबवू शकत नाही आणि तेथून 'भाजपच्या एकनाथ शिंदे' यांच्या बाजूने न्यायाचा तराजू झुकत गेला.

## BMC महापौर पद- शिवसेनेने पुन्हा दावेदारीचे संकेत दिले

मुंबई : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) महापौर पदावर शिवसेनेच्या दाव्याचे संकेत दिले आहेत. ते म्हणाले की, 23 जानेवारीपासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सुरुवात होत आहे. या निमित्ताने BMC मध्ये शिवसेनेचा महापौर असावा अशी शिवसैनिकांची इच्छा आहे. मात्र, शिंदे यांनी हे देखील स्पष्ट केले की, शिवसेना जनादेशाच्या विरोधात कोणताही निर्णय घेणार नाही. त्यांनी आठवण करून दिली की, BMC निवडणूक शिवसेना आणि भाजपने युतीत लढवली होती. ज्या महानगरपालिकांमध्ये शिवसेना आणि भाजपने एकत्र निवडणूक लढवली आहे, तिथे महायुतीचाच

- शिंदे म्हणाले- कार्यकर्त्यांची इच्छा, बाळ ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवसैनिक महापौर व्हावा

महापौर होईल. महाराष्ट्रामध्ये BMC सह 29 महानगरपालिकांमध्ये 15 जानेवारी रोजी निवडणुका झाल्या होत्या आणि 16 जानेवारी रोजी निकाल लागला होता. BMC च्या 227 जागांपैकी भाजपला 89 आणि शिंदे गटाला 29 जागा मिळाल्या होत्या. महापौरपदासाठी बहुमताचा आकडा 114 आहे. यासाठी भाजपला शिंदे गटाच्या 25 नगरसेवकांच्या पाठिंब्याची गरज असेल. निकालानंतर शिवसेनेने आपल्या 29 नगरसेवकांना वांद्रे येथील ताज लँड्स एंड हॉटेलमध्ये थांबवले आहे.

## भाजप स्वत:च्याच नगरसेवकांचे फोन टॅप करतंय

### शिंदेंकडून ब्लॅकमेलिंगचा प्रयत्न, त्यांना महापौरपदात नाही, स्थायी समितीत रस - संजय राऊत

मुंबई : (समर्थ गांवकरी)

भाजप आपल्याच नगरसेवकांवर पाळत ठेवून त्यांचे फोन टॅप करत असल्याचा खळबळजनक दावा ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज माध्यमांशी बोलताना केला. यावेळी बोलताना त्यांनी एकनाथ शिंदे यांनाही बोचरा टोला लगावला आहे. एकनाथ शिंदे ब्लॅकमेल करून स्थायी समिती पदरात पाडून घेण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांना महापौरपदापेक्षा स्थायी समितीत जास्त रस आहे, असे ते म्हणाले.

मुंबई महापौरपदासाठी कुठल्याही परिस्थितीत तडजोड करू नका. महापौरपदावरचा दावा सोडू नका, असा आदेश भाजपच्या दिल्ली हायकमांडकडून देवेंद्र फडणवीसांना गेल्याची माहिती आहे. यावरही संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, माझ्या माहितीप्रमाणे भाजपचा महापौरपदावरील दावा सुटणार नाही. पण अशाप्रकारे ब्लॅकमेक करून काही दुसरे पदरात पाडून घेता येईल का? असा शिंदेंचा विचार आहे. त्यांना स्थायी समिती रस असतो. जिथे पैशांचे किंवा ठेकेदारीचे घोटाळे केले जातात, तिथे या लोकांना रस आहे, असे संजय राऊत म्हणालेत.

एकनाथ शिंदेच्या शिवसेनेने हॉटेल



पॉलिटिक्स सुरू केलंय, तर भाजपने त्यांच्या नगरसेवकांना १० दिवस मुंबई न सोडण्याचे फर्मान काढले आहे. यावरही संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, भाजपच्या प्रत्येक नगरसेवकावर वॉचडॉग ठेवलेले आहेत. त्या त्या भागातील कार्यकर्त्यांना नगरसेवकांवर लक्ष ठेवण्यात सांगितले आहे. ते घरी असले, तरी त्यांच्या लक्ष ठेवले जात आहे. भाजपचे नगरसेवक आणि हॉटेलमध्ये असलेल्या शिंदेंच्या नगरसेवकांचे फोन टॅप केले जात आहेत, असा दावा संजय राऊत यांनी केला. रश्मी शुक्ला नसल्या, तरी प्रक्रिया तीच आहे. भाजप आपला स्वत:च्या नगरसेवकांचे फोन टॅप करत आहे, असेही संजय राऊत म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दावोस दौऱ्यावरही संजय राऊत यांनी टीका केली. दावोसमध्ये गुंतवणुकीवर चर्चा कमी सुरू आहे. मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री यांच्यात मुंबईच्या महापौरपदावरच चर्चा सुरू असते. त्यामुळे यावेळेला महाराष्ट्रात गुंतवणूक कमी येणार आहे. कारण सगळ्यांची गुंतवणूक मुंबई महापालिकेच्या महापौरपदाच्या संदर्भात होत आहे, असे संजय राऊत म्हणाले.

पक्षांतराच्या मुद्द्यावर बोलताना राऊत म्हणाले की, नगरसेवक एखाद्या पक्षावर किंवा चिन्हावर निवडून आला असेल, तर पुढील पाच वर्षे त्याच पक्षात राहून काम करणे गरजेचे आहे. जर त्याला पक्षांतर करायचे असल्यास, आधी पदाचा राजीनामा दिला पाहिजे. पण भाजप आणि शिंदेंच्या बाबतीत तसे दिसत नाहीये. ते दुसऱ्या पक्षात निवडून आलेले आमदार, खासदार, नगरसेवक यांना विकत घेण्याचा प्रयत्न करतात. यालाच मतदारांची प्रतारणा म्हणतात. हा मतदारांचा विश्वासघात आहे. पैशांच्या ताकदीवर निवडणुका बिनविरोधात करून घेणे आणि मतदारांना मतदानापासून दूर ठेवणे यालाही मतदारांची प्रतारणा म्हणतात. सत्ताधाऱ्यांनी मतदारांच्या प्रतारणाविषयी खोलात जाऊन अभ्यास केला पाहिजे, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले.


दशक्रिया विधी

भावपुर्ण श्रध्दांजली



कै. रावसाहेब (सोनुभाऊ) पुंजा कानवडे

शून्यामधुनी विश्व निर्मुनी, कीर्तीसुगंध वृक्ष फुलवूनी लोभ माया, प्रीती देवूनी सत्य सचोटी मार्ग दावूनी
|| अमर जाहला तुम्ही जीवनी ||

शोकाकुल

स्वाती सुनिल कवडे
कविता संजय कवडे
शिवाजी काशिनाथ कवडे
भाऊसाहेब कुशाबा डेरे
नवनाथ आंबादास सावंत
यादव लक्ष्मण सावंत
गिताराम लक्ष्मण सावंत
मच्छिंद्र कृष्णा मालुंजकर
वसंत कृष्णा मालुंजकर

अतुल मच्छिंद्र मालुंजकर
सुनिल धुमाळ
गिताबाई माने
धनश्री कातोरे
बाळासाहेब दशरथ घुले
दत्तात्रय दशरथ घुले
राहिबाई दशरथ घुले
किसनाबाई वाळुंज
अजित मधुकर बोऱ्हाडे

दशरथ सावंत
रमेश सावंत
के. के. नवले
टी. बी .नवले
निवृत्ती आण्णा सावंत
जिजाबाई दशरथ सावंत
स्वाती अनिल सावंत
दादापाटील किसन सावंत
रविंद्र खंडू मालुंजकर

शोकाकुल : समस्त कानवडे परिवार

# "चक्रव्यूह भेदू न शकलेला किनवटचा अभिमन्यू"

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे मुख्यमंत्री हे आधुनिक काळातील अभिमन्यू म्हणून स्वतःची ओळख निर्माण करणारे नेतृत्व म्हणून उदयास आले आहेत. त्याच धर्तीवर, त्यांच्या भारतीज जनता पक्षात किनवट शहरातही एक वेगळी राजकीय कथा आकाराला आली आहे. ती कथा आहे. चक्रव्यूह भेदण्यात अपयशी ठरलेल्या किनवटच्या अभिमन्यूची.



किनवट नगर परिषदेतील माजी उपनगराध्यक्ष व विद्यमान भाजप गटनेते श्रीनिवास किशनराव नेम्मानिवार यांनी २०१७ च्या नगर परिषद निवडणुकीत पहिल्याच प्रयत्नात आपले नेतृत्व सिद्ध करत तत्कालीन बलाढ्य नेतृत्वाचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला. थेट उपनगराध्यक्ष पद मिळवत त्यांनी आपल्या कार्यकुशलतेचा, प्रशासकीय पकडीचा व निर्णयक्षमतेचा ठसा शहराच्या राजकारणावर उमटवला. याच काळात त्यांनी जनतेत एक स्वतंत्र, प्रभावी व विश्वासार्ह नेता अशी ओळख निर्माण केली.

मात्र, वर्ष २०२५ च्या नगर परिषद निवडणुकीत त्यांच्या विरोधात रचलेले राजकीय चक्रव्यूह भेदण्यात त्यांना यश आले नाही. परिणामी, त्यांची मजल केवळ गटनेते पदापर्यंतच मर्यादित राहिली. ही बाब त्यांच्या समर्थकांसाठी तसेच राजकीय वर्तुळासाठीही आश्चर्याची ठरली. ते त्यांच्या प्रभाग क्रमांक ७ मधुन निवडणुक जिंकुन नगरसेवक झाले त्यानंतर त्यांच्या पक्षाची व महायुतीची समोर आलेली आकडेवारी पाहत कोणीही उपनगराध्यक्ष पदाची निवडनुक लढवण्यास तयार नसतांना परत या अभिमन्युने पुढाकार घेतला. आणी आच्छर्य म्हणजे या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत हि त्यांना विरोधी उमेदवाराच्या समसमान ११ मते मिळाली येथे हि त्यांच्याच पक्षाने काढलेल्या शासन निर्णयामुळे म्हणजे नगराध्यक्षांना दिलेल्या एका अतिरिक्त मताच्या संधीमुळे किनवटच्या अभिमन्युचा परत एकदा पराभव झाला.

मागील प्रशासक कालावधीपासूनच किनवट नगराध्यक्ष पदासाठी अनेक इच्छुकांची नावे चर्चेत असताना, त्या सर्वांमध्ये श्रीनिवास नेम्मानिवार यांचे नाव आघाडीवर होते. इतकेच नव्हे तर, आगामी निवडणुकीत ते आपल्या सौभाग्यवतींना नगराध्यक्ष पदावर विराजमान करतील, असा कयास सर्वसामान्य नागरिकांमध्येही बांधला जात होता. परंतु प्रत्यक्षात त्यांच्या पक्षातील तसेच विरोधी पक्षातील काही सहकाऱ्यांनी त्यांच्या भोवती नियोजनबद्धपणे राजकीय चक्रव्यूह उभा केला होता. तो चक्रव्यूह भेदणे त्यांना या वेळी शक्य झाले नाही.

या पराभवामागे अनेक कारणे असली, तरी चक्रव्यूह रचणारेच अखेरीस त्या चक्रव्यूहात भविष्यात अडकतील, असा ठाम विश्वास श्रीनिवास नेम्मानिवार व्यक्त करत असल्याचे त्यांच्या निकटवर्तीय चर्चांमधून दिसून येते. काळच ठरवेल की या चक्रव्यूहात नेमके कोण अडकले, अशी त्यांची भूमिका आहे. राजकीय वाटचालीकडे पाहता, गेल्या ८ वर्षांत त्यांनी भाजपामध्ये जिल्हा उपाध्यक्ष, शहराध्यक्ष अशी महत्त्वाची पदे भूषवली. पक्षाच्या विविध कार्यक्रमांचे, आंदोलनांचे व निवडणुकांचे त्यांनी सक्षम नेतृत्व केले आहे. २०१४, २०१९ व २०२४ या विधानसभा निवडणुकांत आमदार भिमराव केराम यांच्या विजयासाठी शहर व परिसरात अचूक रणनिती आखून त्यांनी मोलाचे योगदान दिले. तसेच २०१९ व २०२४ च्या लोकसभा निवडणुकांतही पक्षाने त्यांच्यावर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवल्या होत्या.

राजकारणासोबतच सामाजिक व व्यावसायिक पातळीवरही त्यांची ओळख ठळक आहे. गेल्या ३५ वर्षांपासून ते किनवटसारख्या छोट्या शहरात दुचाकी वाहन सेवा क्षेत्रात कार्यरत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक कुशल कारागीर घडले आहेत.

## जवाहरलाल नेहरू माध्यमिक विद्यालय बरबडा येथे ८ वे राज्यस्तरीय मराठी ग्रामीण

# साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात संपन्न



**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा येथील नावलोकिक असलेल्या जवाहरलाल नेहरू माध्यमिक विद्यालय बरबडा येथे सकाळी ७ वाजता ग्रंथदिंडी न सुरूवात झाली ग्रंथदिंडी चे उद्घाटन करून बरबडा नगरित वाध्या मुरळी तालावर व वासुदेव आलालारे साकशत विठ्ठल रखुमाई, आदिवासी व भारतमातेच्या सर्व काही विद्यार्थी विराजमान झाले लेले दिवस होते

स्वातंत्र्य सेनानी गोविंदराव धर्माधिकारी साहित्य नगरी बरबडा येथे साहित्य संमेलनाचे उद्घाटन .शिक्षणाधिकारी माधव सलगर यांच्या हस्ते करण्यात आले या वेळी संमेलनाध्यक्ष .महेश मोरे, प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे , गटशिक्षणाधिकिरी सुरेश पाटील ,स्वागताध्यक्ष सदाशिवराव धर्माधिकारी, संस्थेचे अध्यक्ष दिलीप धर्माधिकारी, कार्याध्यक्ष व्ही.टी.सुरेवाड, शिवाजी धर्माधिकारी, ,देविदास फुलारी, मुकुंद बोकारे, आप्पासाहेब खोत, ज्योतीराम फडतरे, सौ. छायाताई धर्माधिकारी , गावातील प्रतिष्ठित नागरित शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते प्रास्ताविक प्राचार्य तथा संमेलनाचे संयोजक प्रा.सुदर्शन धर्माधिकारी, सुत्रसंचलन एन.टी.तिप्पलवाड, संतोष पंचलिंग यांनी तर आभार प्रा. महेश्वर नलबलवार यांनी मानले

# डॉ. तेजल मगजी आविष्कार स्पर्धेत प्रथम

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील विळद घाट मधील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या फिजिओथेरपी महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या पदव्युत्तर विद्यार्थिनी डॉ. तेजल मगजी यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने (MUHS) नाशिकयेथे आयोजित केलेल्या विद्यापीठ स्तरीय संशोधन- आविष्कार या प्रतिष्ठित स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले आहे. तापमान आणि कंपन संवेदनशीलता तपासण्यासाठी त्यांनी एक अभिनव उपकरण तयार केले आहे.



रुग्णांमधील संवेदनशीलता कार्याचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी डिझाइन केलेले हे नाविन्यपूर्ण उपकरण, न्यूरो फिजिओथेरपी विभागाच्या प्राध्यापिका आणि विभागप्रमुख डॉ.सुवर्णा गणवीर आणि विभागप्रमुख डॉ.श्याम गणवीर यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली विकसित केले गेले. हा शोध फिजिओथेरपी क्षेत्रातील कार्यक्षम आणि अचूक निदान साधनांची महत्त्वाची गरज पूर्ण करतो.

ही ओळख महाविद्यालयाचा संशोधन, नवोपक्रम आणि व्यावहारिक, समस्या निवारक शिक्षणावरील मजबूत भर अधोरेखित करते. डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे फिजिओथेरपी महाविद्यालय, जे MUHS शी संलग्न आहे आणि बॅचलर आणि मास्टर ऑफ फिजिओथेरपी दोन्ही कार्यक्रम देते, विद्यार्थ्यांना आरोग्यसेवेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या उत्कृष्ट संशोधनात सहभागी होण्यास प्रोत्साहित करते .

डॉ.तेजल मगजी पदव्युत्तर विद्यार्थिनी असुन यांची ही उपलब्धी क्लिनिकल प्रॅक्टिसमध्ये विद्यार्थी - नेतृत्वाखालील नवोपक्रमाची क्षमता दर्शवते. आम्हाला त्यांच्या समर्पणाचा आणि आमच्या प्रतिष्ठित प्राध्यापकांनी दिलेल्या उत्कृष्ट मार्गदर्शनाचा सार्थ अभिमान आहे. अशी प्रतिक्रिया महाविद्यालयाच्या प्रतिनिधीने व्यक्त केली.

# कलावंतांनी सहभागी होण्याचे आवाहन


**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नवरत्न बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त पट्टे बाबुराव रंगमंच बिलोली येथे दिनांक २७ जानेवारी रोजी भव्य लोककला महोत्सवाचे आयोजन केले असून यामध्ये शाहिरी वाघ्या मुरळी गोंधळी जोगवा भारुड पोवाडा लावणी आणि वासुदेव या कलावंतांनी सहभागी होण्याचे आवाहन लोककला महत्त्वाचे प्रमुख डॉ.मनोज शंकपाळे इंद्रजीत तुडमे,शाहीर दिगु तुमवाड यांनी केली आहे. बिलोली येथील पट्टे बापूराव रंगमंच येथे दिनांक २७ जानेवारी रोजी दुपारी तीन ते सायंकाळी दहा वाजेपर्यंत चालणाऱ्या या लोककला महोत्सवाचे उद्घाटन सुप्रसिद्ध शाहीर दिगू तुमवाड यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

# स्वारातीम विद्यापीठात स्पेनमधील आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ प्रा. डॉ. जुआन गार्सिया-बेलिडो यांचे 'गुरुत्वाकर्षण तरंगाचे विज्ञान' विषयावर विशेष व्याख्यान

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील भौतिकशास्त्र संकुलाच्या वतीने स्पेनमधील युनिव्हर्सिदाद ऑटोनोमा डी माद्रिद येथील वरिष्ठ प्राध्यापक प्रा. डॉ. जुआन गार्सिया-बेलिडो यांचे 'गुरुत्वाकर्षण तरंगाचे विज्ञान' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन आज मंगळवार, दि.२० जानेवारी, २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता करण्यात आले आहे.



या व्याख्यानाचा लाभ विद्यापीठातील विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक तसेच विज्ञानप्रेमी नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील आणि भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजाराम माने यांनी केले आहे.

शतकानुशतके खगोलशास्त्राचा अभ्यास प्रामुख्याने विद्युतचुंबकीय तरंगांच्या निरीक्षणावर आधारित होता. मात्र सन २०१५ पासून गुरुत्वाकर्षण लहरींच्या प्रत्यक्ष शोधामुळे या क्षेत्रात नव्या युगाची सुरुवात झाली आहे. आइन्स्टाईन यांनी सुमारे शंभर वर्षांपूर्वी भाकीत केलेल्या अवकाश आणि काळ या चारमिती रचनेतील लहरींचा शोध लागल्याने विश्वाकडे पाहण्याचा दृष्टीकोन अधिक व्यापक झाला आहे. कृष्णविवरांची टक्कर, न्यूट्रॉन ताऱ्यांचे विलयन तसेच बिग बँगच्या प्रतिध्वनी यांसारख्या अत्यंत रहस्यमय घटनांचा अभ्यास या लहरींच्या माध्यमातून शक्य झाला आहे.

विश्वरचनाशास्त्र आणि गुरुत्वाकर्षण लहरींच्या सिद्धांतातील अग्रगण्य तज्ञ असलेले प्रा. डॉ. जुआन गार्सिया-बेलिडो या व्याख्यानात गुरुत्वाकर्षण लहरींमागील विज्ञान, त्यांच्या ऐतिहासिक शोधाची पार्श्वभूमी, कृष्णविवरे, विश्वाची उत्पत्ती तसेच भौतिकशास्त्रातील मूलभूत नियम उलगडण्यातील या लहरींचे महत्त्व स्पष्ट करणार आहेत. तसेच भारतातील महत्त्वाकांक्षी 'लायगो-इंडिया मेगा सायन्स प्रोजेक्ट'च्या वैज्ञानिक महत्त्वावरही ते प्रकाश टाकणार आहेत.

हे व्याख्यान सर्वसामान्य श्रोते, विद्यार्थी, संशोधक आणि विज्ञानप्रेमी नागरिकांसाठी खुले असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

# प्रभाग १३ व १५ मधील महायुतीच्या विजयी नगरसेवकांचा भव्य सत्कार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महायुतीच्या प्रभाग क्रमांक १३ मधून विजयी झालेले नगरसेवक सुरेश बनसोडे, सुजाता पडोळे, अनिता शेटीया, अविनाश घुले तसेच प्रभाग क्रमांक १५ मधील दत्तात्रय गाडळकर यांचा उद्योजक राजेंद्र एकाडे व नंदू एकाडे यांच्या वतीने ऐकाडे मित्र परिवारातर्फे जंगी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.



या प्रसंगी महेंद्र पडोळे, विपुल शेटीया, राजाभाऊ एकाडे, संदीप पडोळे, नितीन एकाडे, नितीन पुंड सर, शंकर पटेल, नरसी भाई पटेल, मगन पटेल, वैभव जगताप, सीमा एकाडे, सुवर्णा एकडे, ऋतिका पडूळे, राजू कानडे, रमाकांत पाडळे, अमृत पटेल, गणेश पालवे, संदीप फुलसौंदर, वैभव बोरुडे, अतुल जाधव, प्रवीण जाधव, राजू जग्गी, रमाकांत कोरडे, दिनेश एकाडे, गणेश बुरा, सचिन दळवी, बनकर सर, प्रीतम बोगावत, सुमित फुलडहाळे, मनीष फुलडहाळे, प्रदीप कुसळकर, पंचम पडोळे, राजू जाधव, तुका वाहवळ, सतीश पठारे, बंटी ठोकळ, ओंकार एकाडे, सनी एकाडे, आर्यन एकाडे, प्रवीण जाधव, अल्ताफ पठाण, साजिद शेख यांच्यासह ऐकाडे मित्र परिवारातील सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विजयी नगरसेवकांचा शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

सत्कारास उत्तर देताना नवनिर्वाचित नगरसेवकांनी सांगितले की, निवडणुकीदरम्यान दिलेली सर्व आश्वासने पूर्ण केली जातील. प्रभागाचा सर्वांगीण कायापालट करून आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून विकासाची गंगा प्रभागात वाहणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही त्यांनी ठामपणे नमूद केले.

या सत्कार समारंभाचे स्वागत राजेंद्र एकाडे व नंदू एकाडे यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन नितीन पुंड सर यांनी मानले.

# पती व सासऱ्या विरोधात गुन्हा दाखल

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

कौटुंबिक वादातून एका विवाहितेवर तिच्या पती व सासऱ्याने गंभीर स्वरूपाची मारहाण केल्याचा तसेच विनयभंग केल्याचा प्रकार अहिल्यानगर शहरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पती वैभव पोपट कराळे व सासरे पोपट राधाजी कराळे (रा. साईनाथ बंगला, औसरकर मळा, नानाजी नगर, सारसनगर) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी विवाहितेच्या तक्रारीनुसार, दि.१६ जानेवारी २०२६ रोजी रात्री साडेसातच्या सुमारास त्या सावेडी येथील गावडे मळा परिसरात मावशीच्या घरी असताना पती वैभव यांनी फोन करून त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना अश्लील व शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

# नालेगाव गाडगीळ पटांगण परिसरात वाहतूक कोंडी

**भाजी बाजारामुळे नागरिक त्रस्त**

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील नालेगाव गाडगीळ पटांगण परिसरातील रस्त्यावर दररोज बसणारा भाजी बाजार हा आता नागरिकांच्या डोकेदुखीचा विषय ठरला आहे.

या ठिकाणी सकाळपासूनच विक्रेत्यांची गर्दी होत असल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. या वाहतूक कोंडीमुळे स्थानिक रहिवाशी, विद्यार्थी, तसेच नालेगाव अमरधामकडे जाणारे नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. गाडगीळ पटांगण हे शहरातील एक महत्त्वाचे आणि वर्दळीचे ठिकाण असून, येथे अनेक नागरिक सकाळी - सायंकाळी भाजीपाला खरेदीसाठी येतात. मात्र, नियोजनाअभावी भाजीविक्रेते पटांगणाच्या आत न बसता थेट मुख्य रस्त्यावरच आपली गाडी किंवा टोपली घेऊन बसतात. त्यामुळे रस्त्याची रुंदी कमी होते आणि काही वेळातच वाहतूक कोंडी निर्माण होते. दुचाकी, चारचाकी आणि रिक्षांच्या रांगा लागत असल्याने नागरिकांना त्रासदायक परिस्थितीला सामोरे जावे लागते. स्थानिक नागरिकांच्या मते, या भागात वाहतूक नियंत्रणासाठी ना पोलिसांची उपस्थिती असते, ना महापालिकेचे कुठलेही नियोजन दिसते. "दररोज सकाळ-संध्याकाळ आम्हाला वाहतूक कोंडीत अडकावे लागते. विशेषतः नालेगाव अमरधाम येथे अंत्यविधी किंवा दशक्रिया विधीसाठी येणाऱ्या लोकांनाही



या गोंधळाचा सामना करावा लागतो. अशा वेळी गाड्या पुढे सरकणेही अवघड होते," अशी प्रतिक्रिया स्थानिक रहिवाशांनी दिली. नालेगाव ग्रामस्थांनी महापालिकेकडे ठोस मागणी केली आहे की, गाडगीळ पटांगणाच्या रस्त्यावर बसणारा भाजी बाजार तातडीने आतमध्ये हलवावा. पटांगणात पुरेशी जागा असूनही विक्रेते रस्त्यावर बसतात, त्यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. महापालिकेने कडक कारवाई करून या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा.

वाहतूक कोंडीमुळे फक्त त्रासच नव्हे, तर अपघातांची शक्यता देखील वाढली आहे. अनेक वेळा लहान मुले आणि वृद्ध नागरिक वाहनांच्या गर्दीतून जाताना धोक्यात येतात. त्यामुळे ही समस्या केवळ सोयीची नव्हे तर सुरक्षेची देखील बनली आहे.

# सुधाकर सोनकांबळे यांचे निधन

**कंधार: (समर्थ गांवकरी)**

वांजरवाडा येथील राजकीय क्षेत्रातील चळवळीचा कार्यकर्ता सुधाकर जळबा सोनकांबळे यांचं वयाच्या 55 व्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. सुधाकर सोनकांबळे यांची गावातील गोरगरिब जनतेचा आवाज म्हणून परिसरात मोठी ओळख निर्माण केली होती, हजारो जनसमुदाय व परिसरातील लहान थोरानी त्यांना जड अंतकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. गावासह परिसरात हळहळ व्यक्त करीत अंत्यविधीला हजेरी लावली. एक सच्चा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी उभ्या हयातीत कॉंग्रेस पक्षाचा एक निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून ओळख निर्माण केली होती. त्यांनी हजारो लोकांच्या जीवनात एक कुटुंबातील व्यक्ती म्हणून काम केलं. जनतेचा अत्यंत विश्वासू म्हणून त्यांनी ओळख निर्माण केली होती, प्रत्येक नागरिकांच्या डोळ्यात पाणी आणणारा हा अंत्यविधी होता.



त्यांच्या पार्थिवावर वांजरवाडा येथे काल दिनाक 19 जानेवारी रोजी सकाळी 11 वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,एक मुलगी,भाऊ भावजया,नातू असा परिवार आहे. मेजर मधुकर सोनकांबळे यांचे ते धाकटे बंधू होते.

# ज्ञानसंपदा शाळेतील विद्यार्थ्यांनी दिला आठवणींना उजाळा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

ज्ञानसंपदा शाळेत माजी विद्यार्थी संघाचा मेळावा नुकताच आयोजित करण्यात आला. माजी विदयार्थ्यांनी शाळेचा स्नेहभाव वृद्धिंगत होण्यासाठी सतत शाळेशी संपर्कात राहुन शाळेसाठी, सध्या शिक्षण घेत असणाऱ्या विध्यार्थ्यासाठी आपले योगदान द्यावे.





शाळेच्या नवनवीन उपक्रमात आपल्या उच्च शिक्षणाचा, व्यवसायाचा, नोकरीचा अनुभव सांगून मुलांना मार्गदर्शन करावे. वेगवेगळ्या प्रकारचे करिअर मार्गदर्शन सत्र आयोजित करावे, या मुख्य उद्धेशाने व प्रेरणेने माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

सन २०१३-१४ ते २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील असंख्य विदयार्थ्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवून आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला, शाळेने आपल्याला दिलेले संस्काराचे धडे आपल्या पुढील शिक्षणात तसेच दैनंदिन जीवनात अत्यंत उपयुक्त ठरले याविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या .

या माजी विद्यार्थी संघाची एक कोअर कमिटी तयार करण्यात आली जेणेकरून वर्षभर विविध उपक्रम राबविता येतील तसेच शाळेशी आपली नाळ सदैव जोडून राहील . संस्थेचे खजिनदार अविनाश बोपर्डीकर, मुख्याध्यपिका शिवांजली अकोलकर, सहशिक्षक श्री. कैलास जाधव व विद्यार्थी प्रतिनिधी महेश नेमाने,शुभम मडके, ऋषी घुले, रोहित भोजने अंजनी जोशी तनवी बोकील यांचा समावेश केला गेला.

याप्रसंगी संपदा विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री प्रवीण बजाज उपाध्यक्ष श्री. मिलिंदजी गंधे,मानद सचिव अरुण कुलकर्णी यांनी माजी विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील कामगिरीबद्दल तसेच शाळेशी ठेवलेल्या ऋणानुबंधाबद्दल व सहकार्याबद्दल कौतुक करत अभिनंदन करत,माजी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. एक आदर्श नागरिक व संस्कारी विद्यार्थी घडवणे या उदात्त हेतूने या संस्थेची स्थापना कशी केली, याबद्दल संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी याबद्दल आपल्या मनोगतात भावना व्यक्त केल्या.

आपल्या मनोगतात अनेक विध्यार्थ्यानी शाळेच्या दिवसातील आठवणीना उजाळा देत, यापुढे शाळेतील विध्यार्थ्यांना अनुभव विशद करण्याचे व मार्गदर्शन करण्याचे तसेच येणाऱ्या शैक्षणिक वर्षात दोन मुख्य उपक्रम शाळेसाठी व विद्यार्थ्यांसाठी राबविण्याचे आश्वासन दिले.

शाळेच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर व सहशिक्षक श्री कैलास जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना शाळेकडून खास भेटवस्तू ही देण्यात आल्या. याप्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सूत्रसंचालन अंजनी जोशी तनवी बोकील, मनाली कुलकर्णी यांनी केले.

# विवेकभैय्या कोल्हे यांनी दिलेल्या संधीचा जनतेला फायदा करून देणार : जितेंद्र रणशूर

**कोपरगाव : (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव नगरपालिकेच्या इतिहासात सामाजिक समावेशकतेचा नवा अध्याय कोल्हे कुटुंबाच्या नेतृत्वाखाली लिहिला जात असून, हक्काचा नेता हा आपल्या हक्कासाठी ही केवळ घोषणा न राहता कृतीतून सिद्ध होत आहे, असे मत कोपरगाव नगरपरिषदेचे नवनियुक्त उपनगराध्यक्ष जितेंद्र चंद्रकांत रणशुर यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र शासनाच्या सहकार व नगरपालिका क्षेत्रात या पदांसाठी कोणतेही आरक्षण नसतानाही समाजातील कार्यकर्त्यांना संधी देणे, ही सहकार महर्षी शंकरराव कोल्हे साहेबांची व कुटुंबाची दूरदृष्टी




दर्शवते. कोपरगाव नगरपालिकेच्या ७८ वर्षांच्या इतिहासात दलित समाजातील केवळ चार व्यक्तींना उच्च पदावर काम करण्याची संधी मिळाली असून, त्या सर्व संधी कोल्हे कुटुंबाच्या माध्यमातूनच मिळाल्या, हे वास्तव आहे. माजी मंत्री शंकररावजी कोल्हे साहेब यांच्या नेतृत्वाखाली १९८५ मध्ये बाळाभाऊ शिंदे उपनगराध्यक्ष, १९९८ मध्ये सौ. सिंधुताई साहेबराव कोपरे व श्री. प्रकाशराव शिंदे, तसेच २०११ मध्ये सौ. सुरेखाताई विनोद राक्षे नगराध्यक्षपदी विराजमान झाल्या होत्या.यावेळी युवा नेतृत्व विवेकभैय्या कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली, तसेच संजीवनी उद्योग समूहाचे मार्गदर्शक बिपीनदादा कोल्हे व माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली मला ही जबाबदारी मिळाली, याबद्दल मी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. २०११ नंतर पालिका इतिहासात हा पहिला 'सिक्सर' असून, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत दुसरा आणि २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत

### विवेक भैय्या कार्यकर्त्यांना ताकद देणारे शक्तिकेंद्र

सेवा हाच धर्म ही कोल्हे कुटुंबाने सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची घेतलेली भूमिका सर्व स्तरात कौतुकाचा विषय ठरत असल्याचे म्हणाले.कोल्हे कुटुंबाच्या सर्वसमावेशक व न्याय्य कार्यपद्धतीबद्दल सहकार क्षेत्राच्या इतिहासात पहिल्यांदाच मागासवर्गीय समाजातील रमेश घोडेराव यांना सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमनपदी संधी देण्यात आली. तर शेजारी असलेल्या कारखान्याने मागासवर्गीयांना डावलले आहे.विशेष म्हणजे घोडेराव यांना सह्यांचे अधिकार देण्यात आले असून, हे महाराष्ट्रातील एकमेव उदाहरण आहे. हीच परंपरा पुढे नेत मला उपनगराध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली, याचा समाजाला अभिमान वाटत असल्याचे यावेळी सांगितले. **- जितेंद्र रणशूर, उपनगराध्यक्ष, नगरपरिषद कोपरगाव**

विवेकभैय्या कोल्हे यांना आमदार करून तिसरा 'सिक्सर' मारण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला आहे. भाजपचे कार्यकर्ते जिल्हा परिषद व पंचायत समिती पूर्णपणे ताब्यात घेण्यासाठी सज्ज झाले आहेत. ५० दिवस चाललेल्या पालिका निवडणुकीत विवेकभैय्या कोल्हे व संपूर्ण कोल्हे कुटुंबाने दिवसरात्र कार्यकर्त्यांची काळजी घेतली. ऊर्जा देणारे, अभ्यासू व दूरदृष्टी असलेले नेतृत्व म्हणून विवेकभैय्या कोल्हे यांचा विशेष आदर वाटतो. त्यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण मतदारसंघाचा विकासात्मक कायापालट निश्चित होईल, असा विश्वास रणशुर यांनी व्यक्त केला.या विजयासाठी प्रभागातील सर्व मतदार, भाजपचे कार्यकर्ते, आंबेडकरी चळवळीतील भीमसैनिक व मित्रपरिवाराचे रणशुर यांनी विशेष आभार मानले.

# बंडोपंत गोडगे यांना बी द चेंज फाऊंडेशनचा राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार



**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

प्रवरा माध्यमिक विद्यालय भुतेटाकळी येथील कृतीशील व उपक्रमशील नवोदित कवी, शिक्षक श्री बंडोपंत गोडगे यांना कोपरगांवच्या बी द चेंज फॉऊंडेशनचा राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार, परेल मुंबई येथे रविवार दि. १८ रोजी प्रदान करण्यात आला.

श्री. बंडोपंत गोडगे हे गेल्या सहा वर्षापासून विद्यालयात मुलांसाठी विविध उपक्रम राबवित असतात. त्यात प्रामुख्याने - 'एक विद्यार्थी - एक वृक्ष,'' माझी शाळा - माझी परसबाग, ''मूल्यवर्धन काळाची गरज,' गणितीय मूलभूत संकल्पना ' खेळातून गणित शिक्षण, वाचाल तरच वाचाल या नवोपक्रमाची डाएट संगमनेर यांनी दखल घेतली आहे. मुथ्था फाऊंडेशन पुणे यांच्या मुल्यवर्धन उपक्रमात ते जिल्हा सुलभक म्हणून कार्य करत आहेत.

अशा उपक्रमशील व कृतीशील शिक्षक बंडोपंत गोडगे यांना विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री आसिफ पठाण यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या उपक्रमांत त्यांना विद्यालयातील शिक्षक श्री बाळासाहेब फुंदे, श्री भगतसर, श्री टाकाळकर, श्री खुडे आणि शिपाई श्री वाल्मिक फुंदे, अशोक खेडकर यांचे सहकार्य लाभले.

जिल्हा परिषदेच्या मा. अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, पद्मविभूषण डॉ. बाळासाहेब विखे पा.,प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सीईओ सौ.सुस्मितामाई विखे पा. ,संस्थेच्या संचालिका सौ. सरोदे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक यांनी त्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.



# रावसाहेब पूंजा कानवडे यांचे अकस्मात निधन

**संगमनेर खुर्द : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील निमगाव पागा येथील रावसाहेब (सोनूभाऊ) पुंजा कानवडे (वय ४५) यांचे अकस्मात निधन झाल्याने निमगाव पागा परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी वनिता कानवडे,४ मुली, अस्मिता कानवडे, ऋतुजा कानवडे, तनुजा कानवडे, तेजश्री कानवडे,वडील पुंजा रेवजी कानवडे, रामचंद्र रेवजी कानवडे, बाळासाहेब पुंजा कानवडे, भाऊसाहेब रामचंद्र कानवडे. असा परिवार होत.

# प्राचार्य अजय भंडारी यांची स्वीकृत नगरसेवक पदी झालेली नियुक्ती अभिमानास्पद : सुरेश कुचेरिया

### नवोदित स्वीकृत नगरसेवक अजय भंडारी यांचा सत्कार सोहळा

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

शहरातील श्री तिलोक जैन विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी यांनी राजकीय,सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात आपले अमूल्य असे योगदान दिलेले आहे. शाळेबरोबरच समाजाचा, शहराचा सर्वांगीण विकास, पक्षनिष्ठा, उत्तम संघटन कौशल्य इ .बाबींना प्राधान्य दिलेले आहे. त्यामुळेच या सर्व गुणांचा विचार करून नुकत्याच झालेल्या पाथर्डी नगर परिषदेच्या निवडणुकीत शेवगाव -पाथर्डी विधानसभा मतदार संघाच्या लोकप्रिय आमदार मोनिकाताई राजळे यांनी त्यांच्यावर स्वीकृत नगरसेवक पदाची टाकलेली जबाबदारी निश्चितच भूषणावह आहे, असे प्रतिपादन श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे खजिनदार सुरेश कुचेरिया यांनी व्यक्त केले. प्राचार्य अजय भंडारी यांची पाथर्डी नगरपरीषदेच्या



स्वीकृत नगरसेवक पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते अध्यक्ष पदावरून बोलत होते. या वेळी व्यासपीठावर संस्थेचे कार्यकारी सदस्य संपतलाल गांधी, दैनिक दिव्य मराठीचे जेष्ठ पत्रकार अविनाश मंत्री, तिलोक जैन इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य विजय तागड, उप मुख्याध्यापक अशोक गर्जे, पर्यवेक्षक श्रीमती मनीषा मिसाळ, भारत गाडेकर , सुधाकर सातपुते या सह सर्व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते. यावेळी कार्यकारी मंडळाचे सदस्य संपतलाल गांधी, दैनिक दिव्य मराठीचे पत्रकार अविनाश मंत्री यांनी देखील मनोगत व्यक्त करताना प्राचार्य अजय भंडारी यांच्या सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा उल्लेख करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी सत्काराला उत्तर देताना प्राचार्य अजय भंडारी म्हणाले की, आजपर्यंत संस्थेने देखील मला खंबीरपणे साथ दिलेली आहे, प्रत्येक वेळी संस्था माझ्या पाठीशी उभी राहिलेली आहे. केवळ त्यामुळेच शालेय जबाबदारी पार पाडत असतानाच समाजाची, शहराची जबाबदारी देखील उत्तम रीतीने पार पाडण्याची संधी मला मिळाली आहे. त्यामुळे निश्चितपणे मी प्रथम शाळेला प्राधान्य देऊन शाळेबरोबरच शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी देखील प्रामाणिकपणे प्रयत्न करेल, अशी ग्वाही देतो व संस्थेचे देखील मनापासून ऋणभाव व्यक्त करतो.

अशा या उत्साहवर्धक कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे उपमुख्याध्यापक अशोक गर्जे यांनी केले तर सूत्रसंचालन सुनील कटारिया यांनी केले.आभार पर्यवेक्षक भारत गाडेकर यांनी मानले.

# संत फुलाजी बाबा संस्थानचा ४३ वा वार्षिक महोत्सव उत्साहात संपन्न

## पंचक्रोशीतील हजारो भाविकांची उपस्थिती; महाप्रसाद भंडाऱ्याचा लाभ

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट तालुक्यातील टाकळी बंदी येथील श्री संत फुलाजी बाबा संस्थानचा ४३ वा वार्षिक महोत्सव मोठ्या भक्तिभावात व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या महोत्सवप्रसंगी टाकळी मठ संस्थानचे अध्यक्ष सुधाकर भोयर यांनी अध्यक्ष या नात्याने ध्वजारोहन केले. या वार्षिक महोत्सवाला सिद्धेश्वर संस्थान पाटणापूर (ता. उटनूर, जि. आसिफाबाद , तेलंगणा) येथील मुख्य मठाचे अध्यक्ष तथा संत फुलाजी बाबा यांचे चिरंजीव केशवदादा इंगळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पंचक्रोशीतील हजारो भाविक महिला-भगिनी व पुरुष भक्तांनी या यात्रेला मोठ्या संख्येने उपस्थिती नोंदवली. यावेळी केशव दादा इंगळे, सुधाकर भोयर यांच्यासह ABVP नागपुरच्या महामंत्री दुर्गा भोयर



यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. संत फुलाजी बाबा यांचा प्रकटदिन ३० ऑगस्ट रोजी तेलंगणा राज्यात अधिकृत शासकीय सुट्टी जाहीर करून साजरा केला जातो, ही बाब या महोत्सवाच्या महत्त्वात अधिक भर घालणारी आहे. केशवदादा इंगळे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र, तेलंगणा व आंध्र प्रदेशात एकूण २२३ मठ कार्यरत असून, यातील सर्वात पहिला मठ सिद्धेश्वर संस्थान टाकळी वन (ता. उमरखेड, जि. यवतमाळ) येथे आहे. भौगोलिकदृष्ट्या विदर्भात असले तरी पैनगंगा नदीच्या पात्रात व मराठवाड्याच्या सीमेवर असल्यामुळे नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील घोटी, कमठाला, खर्डा, किनवट शहर, मारेगाव (खालचे व वरचे), राजगड, माळबोरगाव आदी भागातील भाविक मोठ्या संख्येने यात्रेस येतात. तसेच विदर्भातील खरबी, दराटी, कोर्टा, थेरडी, टाकळी वन व पंचक्रोशीतील अनेक गावांतील भाविकांनी हजेरी लावली. दि. १७ रोजी झालेल्या कार्यक्रमास केशवदादा इंगळे, दादाराव माघाडे, शेषराव शिरफुले, अशोक कोसले, उपसरपंच राजू सुरोशे पाटील (घोटी), संतोष खुपसे, अनिल भोयर, रामजी बोडके, नरसिंग येंड्रलवार यांच्यासह अनेक मान्यवर हे धार्मिक आयोजनात उपस्थित राहुन सहभागी होते. तर याशिवाय नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार, युवा नेते करण येंड्रलवार, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, नगरसेवक संतोष म्हारसकोल्हे, अक्षय भोयर, संतोष चनमनवार, बबलु वाघमारे, राजु सातुरवार, अशोक शेरलावार, सतीश नेम्मानिवार, डॉ. ढोले, बँकेचे रामराव डवरे, अंकुश जमदाडे आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली.

# विवाहितेचा विहिरीत पडून मृत्यू मृत्यूची नोंद

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

विवाहितेचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना घडली असून मनिषा विकास कल्याणकर असे मृत महिलेचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मनिषा विकास कल्याणकर (वय २६, रा. शिरड वाणी, ता. हदगाव) हा.मु. अर्धापूर माहेरी बारसगाव येथे संक्रांती निमित्त माहेरी आल्या होत्या. दि.१८ रविवारी रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास त्या कोणालाही न सांगता घरून निघून गेल्या होत्या. कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला असता, दि.१९ सोमवारी रोजी दुपारच्या सुमारास जांभरून शिवारातील शेतातील विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती गिरमाजी बारसे रा. बारसगाव यांनी पोलिसांना दिली.

# अळणी बुवा मठ तारातिर्थ संत गौतमेश्वर संत संगम धनेगाव यात्रेस भाविक भक्तासह गर्दी

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

पंचक्रोशीतील प्रसिध्द असलेल्या अळणी बुवा मठ तारातिर्थ संत गौतमेश्वर संत धनेगाव येथील यात्रेत ग्रामीण भागातील अनेक गावातील भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी दर्शनासाठी होती तर सकाळपासूनच हजारो महिला भाविक दर्शनासाठी गर्दी केली होती,रूद्र अभिषेक,गुरूवाणी गुरुपुजन यासह ब्रम्हानंद महाराज सुकळीकर यांचे कीर्तन यासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी 19 जानेवारी रोजी सकाळी 5 ते 8 रूद्र अभिषेक,1008 श्री यदुबन महाराज कौलंबी,श्री आनंदबन गंभीरबन महाराज यांच्या हस्ते तर 8 ते 10 गुरूवाणी गुरुपुजन, सकाळी 10 ते 4 महाप्रसाद, आयोजन करण्यात आले होते



दुपारी ,तारा तिर्थमहात्म,हभप सखाराम महाराज सुकळीकर,हभप हरी महाराज येळेगावकर यांनी केले असून,यावेळी येळेगाव येथील दिंडीचे आगमन झाल्यावर पूजन व आरती करण्यात आली. यावेळी ब्रम्हानंद महाराज सुकळीकर, यदुबन महाराज कोलंबी, नामदेव महाराज बारुळकर, हरिहर महाराज मरळक,सखाराम महाराजसुकळीकर, यांच्या सहशिवसेनेचे हादगावचे आ. बाबूराव पाटील कोहळीकर, डॉ.सचिन पाटील ऊमरेकर,रावसाहेब महाराज श्री संत चरणराज दास ,श्री बाळगिर पंचमगिर गौतमाश्रमी आळणी बुवा मठ तारतिर्थ व गणेश बाळगिर गिरी महाराज व समस्त धनेगाव ग्रामस्थ व ग्रामपंचायत पदाधिकारी व लोकप्रतिनिधीसह भाविक भक्त यांची उपस्थिती होती. यावेळी यात्रे निमित्ताने परिसरात भागात आकाश पाळणे, लहान मुलांसाठी विविध खेळणी दुकाने, मुर्ती विक्री यासह प्रसादाचे अनेक दुकाने मोठया प्रमाणात विविध व्यापारी बांधवांनी लावली होती,तर मुक्कामी असलेल्या भाविकांनी गोदावरी नदीच्या पात्रात स्नान करून दर्शन घेतले,ग्रामीण पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली साहयक पोलीस निरीक्षक सचिन गढवे व पोलीसअंमलदार यांनी यात्रा परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/०१/२०२६ अकोले दि. ०२/०१/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. रावजी बारकु उघडे, रा.कुमशेत**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांचे वडील कै. बारकु रावजी उघडे यांचा मृत्यू दि. २०/०५/२०००** रोजी **मौजे कुमशेत** येथे झाला असुन त्यांच्या **वडिलांच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय कुमशेत**, ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. रावजी बारकु उघडे, रा.कुमशेत**, ता. अकोले जि. अहिल्यानगर **अर्जदार यांचे वडील कै. बारकु रावजी उघडे यांचा मृत्यू दि. २०/०५/२०००** रोजी **मौजे कुमशेत** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय कुमशेत**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०२/०१/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

हुकूमावरुन,

कामगिरी क्लर्क

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले

# मणिकर्णिका घाटावर झालेल्या पाडकाम पार्श्वभूमीवर सभापती प्रा. राम शिंदे आक्रमक

- तोडफोड प्रकरणी जामखेड तालुक्यातील जनतेमधे प्रचंड नाराजी
- जे गुन्हेगार असतील त्यांच्या वरकठोरातील कठोर कारवाई करण्यात यावी.
- जास्तीत जास्त शिक्षा झाली पाहिजे असी मागनी जामखेड कर करत आहेत.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना निवेदन

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी वाराणसी येथे बांधलेल्या ऐतिहासिक मणिकर्णिका घाटावर झालेल्या पाडकामाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विधानपरिषद सभापती



प्रा. राम शिंदे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत, थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडे निवेदन देवून लक्ष वेधले आहे.

सभापती राम शिंदे हे २८ व्या कॉमनवेल्थ स्पीकर्स आणि प्रिसायडिंग ऑफिसर्स परिषदेनिमित्त दिल्ली दौऱ्यावर आहेत. सभापती प्रा. शिंदे यांनी गुरूवारी ( ता. १५ ) वाराणसीच्या मणिकर्णिका घाटाच्या मुद्द्याकडे केंद्र सरकार व उत्तर प्रदेश सरकारचे लक्ष वेधले. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून, या प्रकरणाचे गांभीर्य निदर्शनास आणून दिले. त्याचबरोबर संबंधित कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन आवश्यक कागदपत्रे व छायाचित्रे सादर करत अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

सभापती प्रा. शिंदे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, १८ व्या शतकातील हा घाट केवळ दगड आणि पायऱ्या बांधकामाचा भाग नसून, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या दूरदृष्टीचे, श्रद्धेचे आणि भारतीय सांस्कृतिक वारशाचे जिवंत प्रतीक आहे. वाराणसी शहर विकास प्राधिकरणाकडून सुरू असलेल्या कामामुळे या ऐतिहासिक संरचनेला हानी पोहोचत असल्याची बाब अत्यंत वेदनादायक असून, विकासाच्या नावाखाली ऐतिहासिक वारशाचा नाश होऊ नये, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली आहे.

अहिल्यादेवी होळकर यांनी काशी विश्वनाथ, मणिकर्णिका यांसारख्या पवित्र स्थळांसह देशभरात अनेक घाट, मंदिरे आणि धर्मस्थळांचे पुनरुज्जीवन केले होते. अशा महान वारशाशी निगडित घाटावर पाडकाम होणे हे केवळ ऐतिहासिक नव्हे, तर सांस्कृतिक दृष्ट्याही मोठे नुकसान आहे.याप्रकरणी पुढील कोणतीही हानी तातडीने थांबवावी, संबंधित घाटाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने पुनरुज्जीवन करावे आणि वारसा संवर्धनाच्या दृष्टीने स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी विनंती त्यांनी केंद्र व उत्तर प्रदेश सरकारकडे केली आहे.

वाराणसीतील मणिकर्णिका घाट परिसरात सुरू असलेल्या पुनर्विकासादरम्यान पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या काळातील ऐतिहासिक घाट आणि त्यासंबंधित संरचनांचे नुकसान झाल्याचे उघडकीस आले आहे. विकासाच्या नावाखाली १८ व्या शतकातील वारसास्थळावर पाडकाम झाल्याने देशभर संताप व्यक्त होत. अहिल्या भक्तांमध्ये प्रचंड नाराजी पसरली असून, महाराष्ट्रात या घटनेचे तीव्र पडसाद उमटत आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याशी भावनिक आणि सांस्कृतिक नाते असलेल्या लाखो नागरिकांसाठी हा घाट श्रद्धेचा विषय आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे संवेदनशीलतेने पाहून सरकारकडून तातडीची पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या विषयावर चर्चा करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आपण प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर करणार असून, लवकरच लखनौ येथे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची भेट घेऊनही सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. **- प्रा. राम शिंदे, सभापती विधानपरिषद**

# निवृत्तीनंतरही समाजसेवेचा वसा; मोहन नरहरी नातू यांचा प्रेरणादायी उपक्रम

■ शहीद सैनिकांच्या वीरपत्नींना दरवर्षी १ लाख ११ हजार रुपयांचे मानधन देण्याचा संकल्प



अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

देशसेवेची भावना मोहन नरहरी नातूच्या कार्यामागे कायम केंद्रस्थानी राहिली आहे. देशाच्या सीमेवर आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूर सैनिकांचे बलिदान हा त्यांचा आदर्श असून, त्यासाठी प्रत्यक्ष मदत करण्याचा ध्यास त्यांनी मनाशी धरला. त्याच भावनेतून शहीद सैनिकांच्या वीरपत्नींना दरवर्षी १ लाख ११ हजार रुपयांचे मानधन देण्याचा संकल्प त्यांनी केला आहे. या उपक्रमासाठी ते स्वतःकडून ११ हजार रुपये देतात, तर प्रत्येकी ५०० रुपये याप्रमाणे २०० मित्रांच्या सहकार्याने १ लाख रुपयांची रक्कम जमा करून ती थेट संबंधित वीरपत्नीच्या बँक खात्यात जमा केली जाते. शहीदांच्या बलिदानाचे महत्त्व समाजासमोर मांडण्याचा हा उपक्रम ते गेल्या अकरा वर्षांपासून अखंडपणे राबवत आहेत. निवृत्तीनंतरही सामाजिक बांधिलकी जपत देशभक्तीचा आदर्श समाजासमोर ठेवणारे मोहन नरहरी नातू यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. अहिल्यानगर येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मोहन नरहरी नातू यांनी ५० वर्षांच्या यशस्वी व्यावसायिक कारकिर्दीनंतर निवृत्त होऊन समाजसेवेसाठी पूर्ण वेळ देण्याचा निर्णय घेतला असून, त्यांचे कार्य शहरासह जिल्ह्यात प्रेरणादायी ठरत आहे.

व्यवसाय करत असतानाच विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून त्यांनी सातत्याने समाजसेवा केली. लघुउद्योग भारती या संघटनेत त्यांनी महाराष्ट्र प्रांत उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली. तसेच जनकल्याण रक्तनगर पेढीच्या स्थापनेपासून दहा वर्षे संचालक म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. एमआयडीसीतील जिमखान्याच्या स्थापनेपासूनही ते संचालक म्हणून कार्यरत होते.

पाण्यावर योगाची प्रात्यक्षिके अनेक जलतरण तलावांमध्ये सादर करून मुल व तरुणांना पोहण्यास प्रोत्साहित करण्याचे कार्य त्यांनी केले. शारीरिक आरोग्यासोबतच आत्मविश्वास वाढवण्यावर त्यांनी विशेष भर दिला.



ठाणे : ठाणे महानगरपालिकेतील दिवा शहरातील प्रभाग २७ मधील नवनिर्वाचित नगरसेविका स्नेहा अमर पाटील यांनी आज बहुजणांचे प्रेरणास्थान सिद्धार्थ बुद्ध विहारात भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून चौकातील नामफलकाला पुष्पहार घातला यावेळी दिव्यातील शेकडो आंबेडकर चळवळीतील अनुयायी व बौद्ध समाज उपस्थित होता. तसेच नव निर्वाचित नगरसेविका स्नेहा पाटील यांचे अभिनंदन करून सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### शिवसेनेच्या दहा नगरसेवकांचा शिवालयात भव्य सत्कार

■ 'आज दहा, उद्या महापौर आणि आमदारही शिवसेनेचाच' – विक्रम राठोड

अहिल्यानगर (स. गांवकरी) : येथील महानगरपालिका निवडणूक २०२६ मध्ये प्रतिकूल परिस्थिती, दबाव आणि विरोधी प्रवाहाला छेद देत शिवसेना शिंदे गटाचे दहा नगरसेवक विजयी झाले. या दणदणीत यशाबद्दल चितळे रोड येथील हिंदूधर्मरक्षक स्वर्गीय आमदार अनिलभैय्या राठोड यांच्या कार्यालयात भव्य सत्कार समारंभाचे आयोजन केल होते. या कार्यक्रमात शिवसेनेचे युवा नेते विक्रम राठोड यांच्या हस्ते नवनिर्वाचित नगरसेवकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक सुरेखा कदम, मंगल लोखंडे, सुनीता गेनाप्पा, रूपाली दातरंगे, वैशाली नळकांडे, बाळासाहेब बोराटे, संजय शेंडगे, दत्तात्रय कावरे, गणेश कवडे व नवनाथ कातोरे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच संभाजी कदम, शाम नळकांडे, संतोष गेनाप्पा, परेश लोखंडे,दातरंगे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. सत्कारप्रसंगी बोलताना विक्रम राठोड म्हणाले, "काही जागांवर अत्यल्प मतांनी पराभव स्वीकारावा लागला असला, तरी तो पराभव नसून पुढील लढ्याची नांदी आहे. पुढील पाच वर्षे महानगरपालिकेत शिवसेना सत्ताधाऱ्यांची झोप उडवेल. नगर शहरातील प्रश्न, अन्याय, भ्रष्टाचार आणि हिंदुत्वाचा बुलंद आवाज शिवसेना आक्रमकपणे मांडेल." ते पुढे म्हणाले, "आज दहा नगरसेवक आहेत, उद्या नगरचा महापौर आणि आमदारही शिवसेनेचाच असेल. नगरच्या राजकारणात शिवसेनेचा भगवा झेंडा पुन्हा अभिमानाने फडकणार आहे. हे कोणीही रोखू शकत नाही," असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### २३९ अर्ज विक्री व पं स .साठी उ बा ठा एक व अपक्ष एक अर्ज दाखल

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती पंचवार्षिक निवडणुकी साठी २३९ नामनिर्देशनअर्ज विक्री झाली आहे . पंचायत समिती साठी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून व स्वतःचा अपक्ष अर्ज नरेंद्र शंकर नव्हे यांचा दाखल झाला आहे . अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. स्वप्निल मोरे व सहाय्यक निवडणूक अधिकारी डॉ. सुनील शेळके यांनी सांगितली . यावेळी उमेदवारी अर्ज घेण्यासाठी तालुका पंचायत समितीच्या आवारात सर्व पक्षांनी इच्छुक उमेदवार व कार्यकर्त्यांची व कार्यकर्त्यांची गर्दी पहावयास मिळाली.



### ठाणे पोलिसांनी अंमली पदार्थ विक्री करणारे आंतरराज्यीय रॅकेट केले उघड

ठाणे (स. गांवकरी) : मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर चे हद्दीत अंमली पदार्थाची विकी व सेवन करणा-यांवर कठोर कारवाई करणेबाबत वरिष्ठ. पो. निरी. श्री. अनिल शिंदे यांनी मुंब्रा पोलीस स्टेशनचे एन.डी.पी.एस पथकातील अधिकारी व अंमलदार यांना आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने मुंब्रा पोलीस स्टेशनकडील सपोनि/केदार, सपोनि/जाधव यांना प्राप्त माहितीनुसार बिलाल हॉस्पिटलजवळ करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आरोपीत नामे बासु उमरदीन सय्यद रा. मुंब्रा याचे ताब्यात २३.५ ग्रॅम वजनाचा मोफेड्रीन (एम.डी) पदार्थ मिळुन आल्याने आरोपीताविरोधात गु.र.क्र. ॥ ४६/२०२६ एन.डी.पी.एस ॲक्ट कलम ८ (क), २२ (ब), २९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात येवुन लागलीच पुढील तपासाची सुत्रे फिरवुन मध्यप्रदेश येथुन एम.डी अंमली पदार्थ विकी करिता दोन इसम येणार असल्याची खात्रीशीर माहिती अटक आरोपीताने तपासादरम्यान दिल्याने त्यासुनषंगाने करण्यात आलेल्या कारवाईत आरोपीत नामे रामसिंग अमरसिंग गुज्जर वय-४० वर्षे रा. मध्यप्रदेश व ३) कैलास शंभुलालजी बलई वय-३६ वर्षे, रा. मध्यप्रदेश यांना अटक करण्यात आली असुन आरोपीतांचे ताब्यातुन ०३ किलो ५१५ ग्रॅम वजनाचा रू. ७,३०,५७,७५०/- एकुण किंमतीचा मोफेड्रीन (एम.डी) जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांकडे पोलीस कोठडीदरम्यान करण्यात आलेल्या चौकशीमध्ये सदरचा अंमली पदार्थ आरोपीत यांनी मध्यप्रदेश राज्य येथुन पाहिजे आरोपीतांनी विक्रीकरिता दिला असलेबाबत सांगितल्याने लागलीच सपोनि/केदार, सपोनि / जाधव, पोउपनि/दळवी व पथकाने जि. रतलाम, राज्य-मध्यप्रदेश येथे जावुन केलेल्या कारवाईमध्ये आरोपीत नामे मनोहर लाल रंगलाल गुर्जर व राजु उर्फ रियाजमोहम्मद सुलतानमोहम्मद मंसुरी यांना शिताफीने ताब्यात घेवुन त्यांचे कब्जातुन एकुण ०९ किलो ९५६ ग्रॅम वजनाचा रू. १९,९१,२०,०००/- किंमतीचा मेफेड्रॉन (एम.डी) हा अंमली जप्त करण्यात आला असुन नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

## सिडको वृत्तपत्र विक्रेता टिन शेड वर्धापनदिन निमित्ताने नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी व जेष्ठ वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान व सत्कार

नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)

नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास महामंडळ संलग्न शाखा सिडको वृत्तपत्र वितरक विक्रेता टिनशेडचा चौथ्या वर्धापनदिन निमित्ताने नवनिर्वाचित प्रभाग क्रमांक 20 मधील लोकप्रतिनिधी व जेष्ठ वृत्तपत्र विक्रेता व जिल्हा कार्यकारिणी सह नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचा कार्यकारिणी सत्कार सोहळा संपन्न झाला.



नावा मनपाच्या मनपा निधीतुन सिडको परिसरातील लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सिडको परिसरातील पाण्याचा टाकी जवळ सुमारे 12 लक्ष रूपयांचा निधी अंतर्गत टिन शेड उभारणी 19 जानेवारी 22 रोजी करण्यात आली होती, यावर्षी 19 जानेवारी 26 रोजी चार वर्ष पुर्ण झाल्याबद्दल सत्यनारायण पूजा व अल्पोपहार , कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मनपा प्रभाग क्रमांक 20 मधील नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी संजय पाटील घोगरे,सुवर्णा सतिश बस्वदे,सौ. निरंजना लांडगे, वैजनाथ ईश्वरराव देशमुख,मंगला देशमुख, यांच्या सह राज्य कार्यकारिणी सरचिटणीस बालाजी पवार, जिल्हाध्यक्ष चंद्रकांत घाटोळ,बाबु जल्लदेवार, गणेश वडगावकर यांच्या सह सिडको परिसरातील एकमेव महिला वितरक वंदना लोणे,जेष्ठ विक्रेते शेख सयौध्दीन,दौलतराव कदम,रामनाथ दमकोडंवार, मदनसिंह चोहाण ,एकनाथ श्रंगारे,व नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण देशमुख, कार्याध्यक्ष रमेश ठाकूर, उपाध्यक्ष शाम जाधव ,सचिव निळकंठ वरळे, तिरूपती पाटील घोगरे यांच्या सह व्हाईस ऑफ मिडीयाचे तुकाराम सावंत ,अनिल पाटील धमणे, लोकमत वितरक गणेश डोळस,छायाचित्रकार सारंग नेरलकर,संजय गायकवाड ,यांच्या सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमांचे प्रास्ताविक सिडको वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सतिश कदम यांनी तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष दिलीप ठाकूर,बालाजी सुताडे यांनी केले तर यशस्वीतेसाठी गणेश ठाकूर,अमोल नांदेडकर, सुनिल शिंदे,तातेराव वाघमारे ,राजु चव्हाण, राहुल चौदंते,यांच्या सह वृत्तपत्र विक्रेते यांनी परिश्रम घेतले.

## कामठा(बु.) येथे बुधवार पासून अखंड शिवनाम सप्ताहास प्रारंभ

अर्धापूर : (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील कामठा (बु.) येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरहस्य पारायण व शिव महापुराण कथा सोहळ्यास दि.२१ जानेवारी रोजी बुधवारी सुरुवात होऊन समारोप दि.२८ रोजी बुधवारी वेदांताचार्य दिगांबर शिवाचार्य महाराज (थोरलामठ) वसमत यांच्या महाप्रसादावरील कीर्तनाने समारोप होणार आहे. या सप्ताह मध्ये गुरुपादेश्वर शिवाचार्य महाराज चिल्लरगीरी, करबसव शिवाचार्य महाराज, लासीनमठ वसमत, गुरुपादेश्वर शिवाचार्य महाराज गिरगाव, शिवचैतन्य शिवाचार्य महाराज हदगाव, राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूर, श्री आचार्य गुरुराज महाराज अहमदपूर यांची उपस्थिती राहून आशीर्वाद लाभणार आहेत. सप्ताहामध्ये शिवपाठ, सिद्धेश्वर ग्रामदेवतास रुद्रभिषेक, ग्रंथराज परहस्य पारायण व प्रवचन, शिवकथा, गाथा भजन, शिवपाठ, दररोज रात्री शिवकिर्तन, शिवजागर होईल. सप्ताहामधे अखिलेश महाराज निगडकर, सखाराम महाराज सोनटक्के, सावित्रीबाई मळभांगे (स्वामी), संगीता सुभाष कहाळेकर, मन्मथआप्पा डांगे गुरुजी उस्माननगर, शिवशरण गुरुजी रटकलकर, अमोल महाराज बनवसकर, वैष्णवीताई गोंड पानभोशीकर यांचे कीर्तन होणार आहे. शिवमहापुराण प्रवक्ते नागेश महाराज विभूते वाडी दमई हे राहणार आहेत. दि. २६ रोजी सोमवारी शिवपार्वती विवाह दि.२७ रोजी मंगळवारी ग्रंथराज परम रहस्य मिरवणूक आहे.

## अध्यक्षपदी अमरदीप कदम, स्वागताध्यक्षपदी शिवा पवार

किनवट : (समर्थ गांवकरी)



किनवट तालुक्यातील गोकुंदा येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीची महत्त्वपूर्ण बैठक शुक्रवार, दि. १७ जानेवारी रोजी शासकीय विश्रामगृहात उत्साहात संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते शिवजन्मोत्सव समितीची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी अमरदीप पाटील कदम यांची तर स्वागताध्यक्षपदी शिवा पाटील पवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्याध्यक्ष म्हणून आकाश इंगोले यांची निवड करण्यात आली असून आयोजकपदाची जबाबदारी सुमित माने यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. समितीच्या संयोजकपदी रितेश मंत्री, उपाध्यक्षपदी गणेश आमले व गणेश सोमवंशी, सचिवपदी प्रकाश गोरे, कोषाध्यक्षपदी अक्षय पावडे तर सहसचिवपदी विशाल शिंदे यांची निवड करण्यात आली. तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून महेश दिवसे, किशन मुंगल, राजू कानवटे, सोपान शिंदे, पांडुरंग बादड, सोमेश बेद्रे आणि प्रणव भटकर यांची निवड करण्यात आली. यावेळी बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष अमरदीप कदम यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव हा केवळ उत्सव न राहता समाजप्रबोधन, युवकांमध्ये इतिहासाची जाणीव आणि सामाजिक ऐक्य निर्माण करणारा उपक्रम ठरावा, यासाठी समिती प्रयत्नशील राहील. स्वागताध्यक्ष शिवा पवार यांनीही सर्वांच्या सहकार्याने यंदाचा शिवजन्मोत्सव भव्य व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीस माजी सभापती अनिल पाटील कऱ्हाळे, शिवसेना तालुका प्रमुख मारोती दिवसे पाटील, प्रा. शिवदास बोकडे, पत्रकार काळे, अक्षय पावडे यांच्यासह शिवप्रेमी कार्यकर्ते, युवक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नगर-मनमाड महामार्गावरील वाहतूक कोंडीवर डॉ. सुजय विखे पाटील थेट रस्त्यावर

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)



नगर-मनमाड महामार्गावरील रखडलेल्या रस्ते कामामुळे गेल्या अनेक दिवसांपासून परिसरात तीव्र वाहतूक कोंडी होत असून, दैनंदिन प्रवासी व वाहनचालक अक्षरशः हैराण झाले आहेत. सकाळ व सायंकाळच्या वेळेत वाहनांच्या लांबलचक रांगा लागत असल्याने नागरिकांचा वेळ आणि संयम दोन्ही संपत चालले आहेत. या गंभीर स्थितीची दखल घेत माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी थेट महामार्गावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

डॉ. विखे पाटील यांनी महामार्गावरील विविध ठिकाणी थांबून वाहतूक कोंडीची कारणे जाणून घेतली. अपूर्ण रस्ते काम, अव्यवस्थित वळणमार्ग तसेच अपुरा वाहतूक बंदोबस्त यामुळे समस्या अधिकच गंभीर होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी वाहनचालक, नागरिक व स्थानिक व्यावसायिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी ऐकून घेतल्या. पाहणीदरम्यान पोलीस प्रशासन व संबंधित अधिकारी उपस्थित होते. वाहतूक सुरळीत करण्यासाठी त्यांनी प्रशासनाला तातडीच्या उपाययोजना राबवण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. आवश्यक ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ नेमणे, तात्पुरते पर्यायी मार्ग निश्चित करणे, तसेच कामाच्या ठिकाणी सूचना फलक व प्रकाशव्यवस्था वाढवण्यावर त्यांनी भर दिला.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून डॉ. सुजय विखे पाटील यांनी ठाम भूमिका घेतली.

ज्या ठिकाणी वाहतूक नियंत्रणासाठी मनुष्यबळ अपुरे आहे, तेथे तातडीने होमगार्डची नियुक्ती करावी, अशी मागणी त्यांनी केली. नागरिकांचा त्रास कमी व्हावा आणि वाहतूक सुरळीत व्हावी, यासाठी गरज भासल्यास होमगार्डचा पगार मी स्वतः देईन असे आश्वासनही त्यांनी दिले.

यावेळी बोलताना त्यांनी नागरिकांनीही संयम बाळगण्याचे आवाहन केले. विशेषतः राहुरी परिसरातील नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे त्यांनी सांगितले.

तातडीच्या उपायांसोबतच महामार्गाच्या कामाचा वेग वाढवण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगीतले. काम वेळेत पूर्ण झाल्यास कायमस्वरूपी दिलासा मिळेल, असे सांगत संबंधित कंत्राटदार व यंत्रणांवर जबाबदारी निश्चित करण्याचे संकेतही डॉ. विखे पाटील यांनी दिले.

# जिल्हा बँकेकडून ठेवींवर व्याजवाढ, कर्जावरील टक्का कपात

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)




'जिल्हा मध्यवर्ती बँक सभागृहात बँक व सहकारी पतसंस्था समन्वय बैठक पार पडली. यावेळी जिल्हा बँकेने अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने नवीन पाऊल टाकण्याचा निर्णय घेतला. याअंतर्गत जिल्ह्यातील सर्व सहकारी पतसंस्थांसाठी क्यू.आर. कोड सुविधा जिल्हा बँकेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली जाईल. - चंद्रशेखर घुले, जिल्हा बँकेचे चेअरमन.

पतसंस्थांच्या ठेविंवरील व्याजदरात वाढ समाधानकारक वाढ करीत, ठेविपोटी कर्जाचा टक्काही कपात करण्याचा महत्वपूर्ण निर्णय जिल्हा बँकेने घेतला आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा, काका कोयटे यांनी दिली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जिल्ह्यातील सहकारी पतसंस्थांसाठी अर्धा टक्का ज्यादा म्हणजेच वर्षासाठी ७.४० टक्के आकर्षक व्याजदर घोषित केला आहे. या निर्णयाचे स्वागत करीत, जिल्ह्यातील सहकारी पतसंस्थांनी ठेवी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतचं गुंतवाव्या, असे आवाहन काका कोयटे, फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष सुरेश वाबळे व नाशिक जिल्हा विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा यांनी केले आहे.

काका कोयटे म्हणाले की, अनेक वर्षांपासून जिल्ह्यातील सहकारी पतसंस्थांची ज्यादा व्याजदराची मागणी होती. जिल्ह्याचे सुपूत्र चंद्रशेखर घुले यांनी, जिल्हा बँक अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारताच, सहकारी पतसंस्थांशी चर्चा करून, व्याजदर वाढीबाबत सकारात्मक निर्णय घेतला. यामुळे जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. अध्यक्ष चंद्रशेखर घुले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा बँकेने नुकताच ११ हजार कोटी रुपये ठेविचा टप्पा गाठला आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत ठेवी १२ हजार कोटी रुपयांपुढे जातील. मुदत ठेवींवरील कर्जाचे व्याजदर यापूर्वी २ टक्के होता. तो आता केवळ अर्धा टक्का करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जिल्हा बँकेने घेतला आहे.

सहकारी पतसंस्थांसाठी बँकेच्या बँकिंग विभागात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यातून पतसंस्थांच्या समस्यांचे तत्काळ निराकरण करण्यात येणार आहे. 'सहकार अंतर्गत सहकार' या तत्वानुसार सर्व सहकारी पतसंस्थांनी स्वतःच्या ठेवी जिल्हा बँकेतच ठेवाव्यात, असे आवाहन यावेळी करण्यात आले. जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. माधवराव कानवडे व मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे उपस्थित होते. सहकारी पतसंस्थांची बाजू जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक मधुकरराव नवले, कडूभाऊ काळे, वासुदेव काळे, बँकेचे माजी कार्यकारी संचालक आर. डी. मंत्री, अकोले तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष भाऊ नवले व नितीन चासकर यांनी भक्कम मांडली.

राष्ट्रीयकृत किंवा खासगी बँकांमध्ये ठेवी ठेवल्यास मिळणाऱ्या व्याजावर आयकर कपात होते, मात्र जिल्हा बँकेतील ठेवींवरील व्याजावर आयकर भरावा लागत नाही. यामुळे पतसंस्थांना अधिक आर्थिक लाभ होणार आहे, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# सकल माळी समाजाच्यावतीने नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

**नवनिर्वाचित नगरसेवकांनी समाजाच्या उन्नती बरोबरच शहराच्या विकासासाठी मोठे योगदान द्यावे - किशोर डागवाले**

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीत शहरात माळी समाजाचे अकरा नगरसेवक निवडून आले आहेत. ही भूषणावह बाब आहे. गेल्या अडीच वर्षापासून शहरात सकल माळी समाजाच्या वतीने समाजासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत.

यापूर्वीच्या नगरसेवकांनी केलेल्या सहकार्यामुळे माळी वधू वर कार्यालय सुरू असून महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पूर्ण कृती पुतळ्याचे भूमिपूजन संपन्न झाले आहे. नवनिर्वाचित नगरसेवकांनी समाजाच्या उन्नती बरोबरच शहराच्या विकासासाठी मोठे योगदान द्यावे.थोर समाज सुधारक महात्मा फुले यांना अभिप्रेत असलेले कार्य करावे. असे प्रतिपादन माजी स्थायी समिती सभापती तथा सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे.

माळीवाडा येथील श्री विशाल गणेश मंदिरात महाआरती करुन सकल माळी समाज ट्रस्टच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सत्कारमूर्ती - नवनिर्वाचित नगरसेवक बाळासाहेब बोराटे, दत्ता गाडळकर,सौ.मंगला लोखंडे, सौ.सुजाताताई पडोळे,सौ.आशाताई डागवाले,सौ. सुनीता फुलसौंदर,सौ. वंदनाताई ताठे,सौ.रूपालीताई दातरंगे,सौ.अश्विनीताई लोंढे आदींचा सत्कार करण्यात आला. यावेळी सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले,उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सचिव राजेंद्र पडोळे, जिल्हा परिषद सदस्य शरद झोडगे, श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते,शेंडी गावचे सरपंच सौ.प्रयागाताई लोंढे,माजी नगरसेवक सुरेश आंबेकर, विश्वस्त डॉ.रणजीत सत्रे, विनोद पुंड,कोर कमिटी सदस्य अनिल इवळे,अमोल भांबरकर,कॅप्टन सुधीर पुंड, भास्कर लोंढे,संदीप दातरंगे, अवधूत फुलसौंदर, मनोज ताठे,दीपक खेडकर,माळी महासंघाचे अध्यक्ष भूषण भुजबळ,सावता परिषदेचे अध्यक्ष गणेश बनकर, नितीन डागवाले,रमेश चिपाडे,सुरेश कावळे, राजाराम चिपाडे, प्रा. सुनील जाधव,सुमित लोंढे, विष्णू म्हस्के,बजरंग भूतारे, सुधाकर कानडे,गणेश कोल्हे, लवेश गोंधळे, मच्छिंद्र बनकर, रोहित पठारे, विक्रम बनकर, जालिंदर बोरुडे, बाबासाहेब दळवी, संजय पुंड,रवींद्र विधाते,भास्कर चौधरी, संभाजी चौधरी, कुंडलिक गदादे, निलेश चिपाडे,विष्णू पाबळे, देविदास खामकर, नारायण इवळे, संतोष हजारे, एकनाथ व्यवहारे, माळी महासंघाचे नंदकुमार नेमाने, संदीप दळवी,मनोज भुजबळ, मनोज फुलसौंदर, गणेश धाडगे, विवेक फुलसौंदर, भगवान हजारे,तुषार फुलारी, गणेश फुलसौंदर,योगेश फुलारी, यश भांबरकर, दत्तात्रय पडोळे, मंगल भुजबळ, रेणुका पुंड, रोहिणी बनकर, प्रणल गारुडकर आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना बाळासाहेब बोराटे म्हणाले, १९९१ साली तत्कालीन नगरपालिकेच्या काळात माळी समाजाचे १७ नगरसेवक होते. मध्यंतरीच्या काळात पाच ते सहा नगरसेवक निवडून आले होते.या महानगरपालिकेच्या निवडणुकीत माळी समाजाचे विविध पक्षातून अकरा नगरसेवक निवडून आले आहेत.या सर्व नगरसेवकांचे मी स्वागत करतो. नवनिर्वाचित नगरसेवकांनी महानगरपालिकेच्या माध्यमातून विविध समाजाचे प्रश्न व जनतेच्या समस्या सोडविण्याचे कार्य करावे.

प्रा.माणिक विधाते म्हणाले,श्री विशाल गणेशाच्या साक्षीने नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला आहे. गणपतीचा आशीर्वाद घेऊन नवनिर्वाचित नगरसेवकांनी बदलत्या अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी योगदान द्यावे.

शरद झोडगे म्हणाले,निवडून आलेले नगरसेवक समाजापुरते मर्यादित राहिले नाही तर ते जनतेच्या दृष्टीने आम आदमी झाले आहेत. संजय गारुडकर म्हणाले, सामाजिक प्रश्नांची जाण असल्याने जनतेने नवनिर्वाचित नगरसेवकांना निवडून दिले आहे. जनतेच्या समस्या सोडून त्यांनी त्यांच्या कार्याचा ठसा उमटवावा.

बाळासाहेब भुजबळ म्हणाले, या महानगरपालिकेच्या निवडणुकीत विविध पक्षांनी २२ माळी समाजाच्या उमेदवारांना संधी दिली होती.निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांचे अभिनंदन करतो.तसेच या कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व समाज बांधवांच्या आभार मानतो. या कार्यक्रमासाठी सकल माळी समाजाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रविंद्र भोर यांना सह्याद्री भूषण पुरस्कार जाहीर

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**



जुन्नर तालुक्याचे भूषण उदापूर गावचे सुपुत्र,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांना सह्याद्री भूषण पुरस्कार जाहीर झाला असून येत्या शुक्रवार दि:-२३ जानेवारी रोजी मारखुलवाडी मुथाळणे येथील राष्ट्रसंत गाडगेबाबा सेवा गौरव समितीच्या वतीने प्रदान करण्यात येणार आहे अशी माहिती संस्थेचे लोकशाहीर व जनसेवक भीमराव ठोगिरे यांनी दिली. गेली २५ वर्षे रविंद्र भोर पत्रकार क्षेत्रात असून त्यांनी समाजातील अनेक समस्यांवर प्रकाश टाकणारे वार्तांकन केले असून खास करून जुन्नर तालुक्यातील आदिवासी अतिदुर्गम भागातील आदिवासी गावातील मूलभूत गरजा व समस्या मिटविण्यासाठी आपल्या लेखणीतून शासन दरबारी प्रश्न उपस्थित केले आहेत याचीच दखल घेत रविंद्र भोर यांना या पुरस्कारास पात्र मानले आहे यापूर्वी अनेक पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले आहे. विशेषतः चाईल्ड फंड इंडिया व स्थायी विकास संस्था या एनजीओ संस्थेच्या माध्यमातून अनेक सामाजिक,शैक्षणिक, व्यवसायिक कामे खास महिला बचतगट व महिला ग्रामसंघातील महिलांसाठी सेवा सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.या पुरस्काराचे विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे रविंद्र भोर यांचे पत्रकारिता क्षेत्रातील गुरू व दैनिक समर्थ गावकरी चे संपादक आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांचे शुभहस्ते आणि अनेक राजकीय मान्यवर नेत्यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.

## रामचंद्र नेवासकर यांचे निधन

**कोतुळ : (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुक्यातील कोतुळ येथील शिंपी समाजाचे रामचंद्र हरिभाऊ नेवासकर यांचे वृद्धापकाळाने शनिवार दि,17 जानेवारी 2026 रोजी पहाटे निधन झाले, त्यांनी त्यांचे काळात सामाजिक वारसा जपत समाजीकव धार्मिक सेवा केली, कोतुळ येथील स्वामी समर्थ फोटो स्टुडिओ चे संचालक फोटोग्राफर बाळासाहेब रामचंद्र नेवासकर, राजेंद्र रामचंद्र नेवासकर यांचे ते वडील होते त्यांच्या पश्यात पत्नी एक भाऊ दोन मुले एक मुलगी असा सेवाभावी परिवार आहे, दुःखद अंतःकरणात त्यांचेवर कोतुळेश्वर येथे मुळा नदी तीरावर अंत्यसंस्कार करण्यात आले, मृत्यूसमयी त्यांचे वय 85 वर्षांचे होते.

## अभिनेते संदीप पाठक यांच्या हस्ते पारितोषिक वितरण संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



श्री शिव छत्रपती महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून सिने अभिनेते,विनोदी व्यक्तिमत्व, उत्कृष्ट कवी संदीप पाठक यांच्या हस्ते वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.संदीप पाठक यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये आपलं ध्येय निश्चित करून आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रीत करावे असा मोलाचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी सोशल मीडिया पासून दूर राहून त्याचा योग्य वापर करावा विद्यार्थ्यांची वाचन संस्कृती वाढवावी, तसेच पालकांनी विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनाचा पुरेपूर आनंद घेऊ द्यावा.नाट्य साहित्यामध्ये मराठी रंगभूमीचं सुवर्णपान म्हणून जगातील एकमेव प्रतिकृती असणारे लक्ष्मण देशपांडे यांच "वऱ्हाड निघाल लंडनला" या एकपात्री नाटकाचे देशभरात एकूण २८०० प्रयोग झाले. त्यातील संदीप पाठक यांनी एक पात्री नाटकाचे ६०० प्रयोग करुन त्यामध्ये दोन तासात ५२ पात्र साकारणारे अभिनेते म्हणून परिचित आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड.संजय शिवाजीराव काळे यांनी आपल्या मनोगतातून शिक्षण क्षेत्रामध्ये विशेष नैपुण्य प्राप्त केलेले प्राध्यापक, कर्मचारी,विद्यार्थी यांचे कौतुक केले. श्री शिव छत्रपती महाविद्यालयाने अनेक विद्यार्थी कलावंत, दिग्दर्शक,अधिकारी, डॉक्टर,सैन्य व पोलीस दल अशा विविध क्षेत्रांमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपलं नाव उज्वल केल्याचा सार्थ अभिमान आहे. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ हा प्राध्यापक,कर्मचारी,विद्यार्थी यांच्या पाठीवर शब्बासकी देण्यासाठी असल्याचे ॲड.संजय शिवाजी राव काळे यांनी सांगितले.या कार्यक्रम प्रसंगी आदर्श गुणवंत प्राध्यापक व प्राध्यापिका पुरस्कार प्रा. अभिजीत डुंबरे,प्रा.सारिका सोनार व आदर्श गुणवंत कर्मचारी पुरस्कार मनीषा कोरे तसेच आदर्श विद्यार्थी व विद्यार्थिनी पुरस्कार अनुक्रमे कु. रवी सोमा कोकणे, कु.संतोषी संतोष कामटकर यांना प्रदान करण्यात आला. विशेष नैपुण्य प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीशेठ काळे,संस्थेचे सचिव दत्तात्रय थोरात,संस्थेचे सहसचिव सुभाष कवडे,संस्थेच्या खजिनदार कांताताई मस्करे, विश्वस्त अनिलकाका जोगळेकर,ॲड.अविनाश थोरवे, अशोकराव काळे,अध्यक्ष प्रतिनिधी प्रा.व्ही.बी. कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. बी. वाघमारे उपप्राचार्य डॉ.आर. डी.चौधरी, समन्वयक व उपप्राचार्या प्रा.पी.एस.लोढा, स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. डी.बी.सोनार,पर्यवेक्षक प्रा.एस.ए.श्रीमंते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वर्षा देसाई तर आभार डॉ.आर. डी.चौधरी यांनी केले.

## मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी राजु शेख

**श्रीगोंदा तालुका :**

- उपाध्यक्षपदी मांडे तर सचिव कोळपे यांची निवड

**(समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या श्रीगोंदा तालुका अध्यक्षपदी राजु शेख, उपाध्यक्ष विजय मांडे तर सचिवपदी रामदास कोळपे यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा अध्यक्ष दत्ता पाचपुते यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले आहे.

सोमवार दि.19 रोजी तालुका विश्रामगृह येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची श्रीगोंदा तालुका पदाधिकारी यांची मावळते अध्यक्ष पिटर रणसिंग यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यामध्ये पुढील निवडी करण्यात आल्या अध्यक्षपदी राजु शेख,उपाध्यक्ष विजय मांडे, रामदास कोळपे यांची तर कार्याध्यक्ष केशव कातोरे, खजिनदार सुरेश हिरवे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. हि निवड एक वर्षासाठी केली आहे. निवडीनंतर मान्यवरांच्या हस्ते नुतन पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच जेष्ठ पत्रकार अमिनभाई शेख यांची श्रीगोंदा नगरपालिकेत स्विकृत नगरसेवक म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते म्हणाले कि राज्य मराठी पत्रकार संघाचे संघटक संजय भोकरे,राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली आपण ह्या निवडी करित आहोत. पत्रकार संघात काम करताना आपण संघातील प्रत्येक व्यक्तीला दरवर्षी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त सहा जानेवारीला निवडी करुण काम करण्यासाठी संधी देतो. आतापर्यंत संघात प्रत्येक पदाधिकारी यांनी चांगले काम करुण संधीचे सोने केले आहे.

पुढील काळात निवडलेले सहकारी आणखी उल्लेखनीय काम करतील याचा मला आत्मविश्वास आहे. यावेळी प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद परदेशी,तालुकाध्यक्ष सुरेशमामा सुपेकर, विजय भंडारे, संजय शेळके,मल्हारी शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

### नगरपालिकेत पत्रकारांचे प्रश्न सोडवू- शेख

तालुक्यातील सर्व सहकारी पत्रकार बंधूंच्या सहकार्याने श्रीगोंदा नगरपालिकेत स्विकृत नगरसेवक म्हणून माझी निवड झाली. मिळालेल्या पदाच्या माध्यमातून शहरातील सामान्य जनतेचे तसेच पत्रकार बंधूचा जिव्हाळ्याचा पत्रकार भवनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करु असे आश्वासन जेष्ठ पत्रकार नुतन नगरसेवक अमिनभाई शेख यांनी दिले.

## सांगलीत निरंकारी संत समागमाचा शुभारंभ २४ जानेवारी पासून!

**सांगली : (समर्थ गांवकरी)**

प्रेम, सेवा आणि एकत्वाच्या पावन भावनांनी ओतप्रोत असलेला महाराष्ट्रातील ५९वा निरंकारी संत समागम येत्या २४ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत सांगली येथे श्रद्धा, शिस्त आणि भव्यतेने संपन्न होणार आहे. हा दिव्य समागम संत निरंकारी मिशन यांच्या वतीने परमपूज्य माता सुदीक्षाजी महाराज तसेच निरंकारी राजपिता रमितजी यांच्या दिव्य सान्निध्यात आयोजित करण्यात आला आहे. सांगली शहरालगत सांगलवाडी परिसरातील सुमारे ४०० एकरांच्या विस्तीर्ण मैदानावर या संत समागमाचे आयोजन करण्यात आले असून, तीन दिवस चालणाऱ्या या आध्यात्मिक सोहळ्याची तयारी सध्या अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

## बालचित्रकला स्पर्धेसाठी बालचित्रकारांचा उत्साह शिगेला

### नवनिर्वाचित नगरसेविका दर्शना म्हात्रे व साक्षी मढवी यांची उपस्थिती

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



दिव्यातील दातिवली येथील गणेश विद्यालयात सकाळ बालचित्रकला स्पर्धेसाठी रविवारची सुट्टी असताना सुद्धा झोपेला रामराम करून खेळाला दांडी मारून मोठ्या उत्साहात हातात ब्रश, रंगाचे कुंचले घेऊन विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेसाठी गर्दी करून उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या बरोबर शाळेचे शिक्षकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाचवी ते सातवी व आठवी ते दहावीच्या गटातून दिवा शहरातील विविध शाळांमधून जवळपास 400 विद्यार्थी सहभागी झाले होते यावेळी मुलांचा चित्र काढण्याचा उत्साह ओसंडून गेला होता क गटातून सहवीतील आर्या पाटील व स्वरा पवारने बस स्टँड सुरेख रंगसंगतीने चित्र रेखाटले तर सातवीतील समृद्धी सुहास,व प्रियांशु म्हात्रे याने खेळातील रस्सीखेच चित्र काढून त्या चित्राला आकर्षक रंग दिले. आठवीतील यश कुले यांनी आपल्या सहलीतील अनुभवातून ऐतिहासिक वास्तूचे चित्र साकारले. तर ब गटातून चौथीतील स्वरा घाणेकर व तिसरीतील अगया गुप्ता या चिमुकल्यांनी माझी मैत्री या विषयावर सुंदर चित्र काढले यावेळी चित्र काढताना मुले आपल्या भावविश्वात हरवून गेली होती चेहऱ्यावर हास्य व समाधानाचे चित्र तरंगत होते.

गणेश विद्यामंदिर संस्थेचे अध्यक्ष साईनाथ म्हात्रे यांनी या स्पर्धेला भेट देऊन मुलांना मार्गदर्शन करून त्यांचे कौतुक केले तर दिव्यातील नवनिर्वाचित नगरसेविका दर्शना म्हात्रे व साक्षी मढवी यांनी स्पर्धेला भेट देऊन लहान मुलांमध्ये जाऊन मुलांशी हितगुज करून हातात ब्रश घेऊन त्या लहानपणाच्या आठवणीत हरवून गेल्या प्रसंगी सर्व सहभागी शालेय विदयार्थ्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेतील मुख्याध्यापक अनिल भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षिका पूनम बुधवंत यांनी मुलांच्या बैठक व्यवस्था व इतर कामे पाहिली.

## शिवमुद्रा करंडक नृत्य स्पर्धेत एस.एन इंग्लिश स्कूलचे यश




**चाकण : (समर्थ गांवकरी)**

चाकण म्हाळुंगे या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या नृत्यस्पर्धेत आमच्या शाळेच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी करत मोठे यश संपादन केले. या स्पर्धेत दोन गटांनी सहभाग घेतला होता. आपल्या सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी नृत्यकलेतील कौशल्य, तालबद्धता व उत्साह यांचे सुंदर दर्शन घडवले. त्यामध्ये पहिल्या गटाने प्रथम क्रमांक, तर दुसऱ्या गटाने तृतीय क्रमांक पटकावून शाळेचे नाव उज्वल केले. या यशाबद्दल सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे मार्गदर्शक शिक्षक मेघा मिस, नयना मिस यांचे परिश्रम व मुख्याध्यापक वसुधा ढोरे तसेच संस्थेच्या अध्यक्षा मेघाताई नितीन राक्षे आणि पालकांचे सहकार्य मोलाचे ठरले.या उल्लेखनीय यशामुळे शाळेचे नाव उज्वल झाले.

## आई-वडिलांची स्वप्ने पूर्ण करणे हेच आव्हान : ह. भ. प. अविनाश भारती

**श्रीगोंद्यात स्व. बापूंच्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प संपन्न**



**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

"आजच्या धावपळीच्या युगात दिशाहीन होत चाललेल्या तरुणांना योग्य दिशा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. मोबाईलचा वापर करून आयुष्याची 'दशा' करायची की त्याला 'दिशा' द्यायची, हे सर्वस्वी तरुणांच्या हातात आहे. ज्या दिवशी राष्ट्रगीताचा खरा अर्थ उमजेल, त्या दिवशी स्वाभिमान जागा होईल," असे प्रतिपादन प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. अविनाश भारती यांनी केले. श्रीगोंदा येथे स्व. बापूंच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प गुंफताना ते 'भारतीय संस्कृती आणि आजची तरुणाई' या विषयावर बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी स्वराज्याची शपथ घेतली, तोच संकल्प आजच्या पिढीने अंगीकारावा, असे सांगत त्यांनी आई, वडील आणि गुरु या तीन गुरूंच्या संस्कारांतून स्वतःला घडवून पालकांची स्वप्ने पूर्ण करणे हेच तरुणांसमोरील खरे आव्हान असल्याचे स्पष्ट केले. आपल्या रंजक आणि ओघवत्या शैलीत त्यांनी भारतीय संस्कृती, आचार-विचारांचे महत्त्व विशद केले. "असामान्य कर्तृत्व गाजविणाऱ्यांच्या जयंती साजऱ्या होतात, तर सामान्यांचे केवळ वाढदिवस. स्व. बापूंनी नगर जिल्ह्याच्या दक्षिण भागात पहिला सहकारी साखर कारखाना उभारून शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला, हे त्यांच्या असामान्य कार्याचे प्रतीक आहे," असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांच्या प्रास्ताविक व अतिथी परिचयाने झाली.

'बापू' नावाच्या परिसस्पर्शाने अनेकांचे जीवन सोन्यासारखे उजळले, अशा व्यक्ती विरळाच असतात. ह.भ.प. अविनाश भारती आपल्या मंजुळ वाणीतून समाजप्रबोधन करत वारकरी संप्रदायाचा वारसा जतन करीत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र (दादा) नागवडे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी तरुणांना मोलाचा संदेश देताना सांगितले की, आजच्या काळात चांगल्या गोष्टी सहज स्वीकारल्या जात नाहीत; मात्र वाईट गोष्टींचे अनुकरण पटकन होते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मोठी स्वप्ने पहा आणि जिद्दीने त्यांचा पाठलाग करा.

वाईट सवयींपासून दूर राहून चांगल्या गोष्टींचे अनुकरण केल्यास प्रगती निश्चित आहे. या प्रसंगी युवा नेते दिग्विजय नागवडे, नागवडे कारखान्याचे संचालक प्रशांत दरेकर, सावता हिरवे, प्रशांत शिपलकर, भाऊसाहेब नेटके, विठ्ठल जंगले, दत्तात्रय काकडे, संदीप औटी, प्रविण लबडे, शरद जगताप, प्रा. सुरेश रसाळ, निरीक्षक सचिन लगड, बी. के. लगड, तसेच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व क्लास वन अधिकारी अकिब शेख यांच्यासह तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी रामदास झेंडे, सुनील बोरुडे, विजय कापसे, पोपट बोरुडे, कार्तिक झेंडे, पत्रकार दत्तात्रय जगताप, काटे महाराज, राजेंद्र क्षीरसागर यांच्यासह प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शंकर गवते यांनी केले, तर डॉ. धर्मनाथ काकडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## नर्सिंग हे केवळ शिक्षण किंवा नोकरी नसून ती मानवतेची सर्वोच्च सेवा: डॉ. विश्वासराव आरोटे!

# हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये दीपप्रज्वलन व शपथविधी सोहळा थाटात संपन्न!
















**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील आरोग्य व नर्सिंग शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन अंतर्गत कार्यरत हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंग अँड रिसर्च सेंटर, अकोले येथे नर्सिंग विद्यार्थ्यांचा दीपप्रज्वलन व शपथविधी सोहळा शुक्रवार, दि. १६ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता महाविद्यालयाच्या भव्य कॅम्पस परिसरात अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. किरण लहामटे (आमदार, अकोले विधानसभा मतदारसंघ) उपस्थित होते. सन्माननीय पाहुणे म्हणून डॉ. विश्वासराव आरोटे (राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई) तसेच अरुण शेळके (माजी सदस्य, पंचायत समिती अकोले) यांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली.

**नर्सिंग सेवेचा आदर्श व मानवतेचा संदेश :** या कार्यक्रमात नर्सिंग शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा विधिवत शपथविधी पार पडला. दीपप्रज्वलनाच्या माध्यमातून नर्सिंग क्षेत्रातील त्याग, सेवा, करुणा, शिस्त व मानवतेचे मूल्य अधोरेखित करण्यात आले. "Caring is the essence of nursing" या ब्रीदवाक्यानुसार विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, कर्तव्यनिष्ठा व व्यावसायिक मूल्यांची पक्की जाणीव निर्माण व्हावी, हा या सोहळ्याचा मुख्य उद्देश असल्याचे मान्यवरांनी स्पष्ट केले. मार्गदर्शन करताना आमदार डॉ. किरण लहामटे म्हणाले, "अकोले तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेला सक्षम करण्यासाठी माझे सर्वतोपरी सहकार्य राहील. ग्रामीण भागातून शिकून बाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्याला घडवणाऱ्या आई-वडिलांचे ऋण कधीही विसरू नये." आरोग्य सेवा ही केवळ व्यवसाय नसून ती माणुसकीची सेवा आहे, असे सांगत त्यांनी अकोले तालुक्यातील डॉक्टरांकडे आजही माणुसकीचे दर्शन घडते, याचा अभिमान व्यक्त केला. शहरी भागात संधी असूनही पुन्हा अकोलेत येऊन सेवा सुरू करणारे डॉ. मनोज सदाफुले यांचे उदाहरण देत, हीच खरी तालुक्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कोरोना काळात व त्यानंतर नर्सिंग कॉलेजच्या माध्यमातून आदर्श पिढी घडवण्याचे कार्य सुरू असल्याचेही त्यांनी गौरवाने सांगितले.

यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी नर्सिंग विद्यार्थ्यांना अत्यंत सखोल, वास्तववादी व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, नर्सिंग हे केवळ शिक्षण किंवा नोकरी नसून ती मानवतेची सर्वोच्च सेवा आहे. रुग्णालयात दाखल होणारा प्रत्येक रुग्ण हा केवळ केस नसून तो एक माणूस आहे, त्याच्या वेदना, भावना आणि आशा समजून घेणे हीच खरी नर्सिंगची भूमिका आहे.

ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या मूळ गावाशी, समाजाशी आणि आई-वडिलांशी नाळ कधीही तोडू नये, असे सांगताना त्यांनी मूल्याधिष्ठित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. आज शिक्षणामुळे तुम्ही मोठे व्हाल; पण नम्रता, माणुसकी आणि सेवाभाव जपलात तरच तुम्ही खऱ्या अर्थाने यशस्वी व्हाल, असा संदेश त्यांनी दिला. आरोग्य क्षेत्रात कार्य करताना प्रामाणिकपणा, शिस्त, वेळेचे पालन आणि रुग्णांशी संवेदनशील वागणूक या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले. नर्स ही डॉक्टरची सहाय्यक नसून रुग्णासाठी आधारस्तंभ असते, असे नमूद करत त्यांनी नर्सिंग व्यवसायाच्या सामाजिक जबाबदारीवर प्रकाश टाकला.

कोरोना काळातील आरोग्य सेवकांचे योगदान आठवून देत, त्या कठीण काळात नर्सेसनी दाखवलेले धैर्य, त्याग आणि समर्पण हे संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. अशाच मूल्यांवर आधारित नवी पिढी घडवण्याचे कार्य हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंगमधून होत असल्याबद्दल त्यांनी संस्थेचे विशेष कौतुक केले. डॉ. आरोटे यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक दृढ झाल्याचे कार्यक्रमस्थळी स्पष्टपणे दिसून आले.

कार्यक्रमास आरिफ भाई तांबोळी, सुरेश नवले, अक्षय आभाळे, डॉ. मीनानाथ चौधरी, डॉ. सदाफुले, संस्थेच्या संस्थापिका डॉ. ज्योती भांडकोळी व डॉ. मारुती भांडकोळी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

तसेच डॉ. वैशाली आर. हिले, प्रा. कविता व्ही. माने, डॉ. राजेंद्र बी. हिले, प्रा. कीर्ती व्ही. गंधाळे, स्वाती माने, नासिर, प्रा. प्रधान यांची प्रमुख उपस्थिती लाभली. राजा हरिश्चंद्रगड शिक्षण संस्थेचे संचालक प्रा. राजेंद्र हिले यांची उपस्थितीही कार्यक्रमास लाभली.

### कार्यक्रमाचे सूत्रसंचालन

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. कीर्ती गंधाळे व प्रा. नासिर यांनी केले, तर आभार प्रदर्शन संस्थेच्या संस्थापिका डॉ. ज्योती भांडकोळी यांनी मानले तर ह.भ.प. ज्ञानेश्वर आरोटे व बिरबल वाकचौरे यांनी कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवर, पालक व नागरिकांनी आयोजकांचे अभिनंदन केले. नर्सिंग क्षेत्रात सेवा, समर्पण, शिस्त व मानवतेची मूल्ये जपणारे सक्षम आणि संवेदनशील व्यावसायिक घडावेत, अशी अपेक्षा यावेळी सर्वांनी व्यक्त केली.

### शंभर टक्के निकाल – विद्यार्थ्यांचा गौरव

यावर्षी महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागल्याबद्दल प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच वार्षिक अहवाल सादरीकरणात विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळविणाऱ्या व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही विशेष गौरव करण्यात आला.









# ‘आजची पिढी जात-धर्माच्या पलीकडे जाऊन माणूस झाली पाहिजे’ : संजय आवटे

**श्रीगोंदा: (समर्थ गांवकरी)**

आजच्या पिढीतील परस्पर संवाद कमी होत चालला असून, करिअरच्या असंख्य संधी उपलब्ध असतानाही त्या विद्यार्थ्यांपर्यंत योग्य प्रकारे पोहोचत नाहीत. त्यामुळे नव्या पिढीने जात व धर्माच्या भिंती ओलांडून प्रथम ‘माणूस’ होणे ही काळाची गरज आहे. तसेच स्त्रियांकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टिकोन बदलून समाजात घडणाऱ्या परिस्थितींवर तरुणांनी निर्भीडपणे आपले मत मांडावे, असे प्रतिपादन पुणे येथील दैनिक लोकमतचे संपादक संजय आवटे यांनी केले.



श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय व लोकनेते स्व. शिवाजीराव (बापू) नागवडे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प रविवारी (दि. १८ जानेवारी २०२६) श्रीगोंदा येथे गुंफण्यात आले. “चला उभारुया युवा पिढी” या विषयावर प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. सुरेश रसाळ यांनी प्रास्ताविक केले, तर उपप्राचार्य चंद्रभान कातोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

आपल्या प्रेरणादायी भाषणात आवटे म्हणाले की, स्व. बापू नागवडे यांच्या कर्तृत्वाला आणि वैभवाला सेवेचे भक्कम अधिष्ठान होते. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक कृतीने समाजमनाला उच्च पातळीवर नेण्याचे कार्य केले. प्रामाणिक, निस्पृह, मितभाषी पण सत्यनिष्ठ असलेले बापू आपल्या अंगभूत तत्त्वज्ञानापासून कधीही ढळले नाहीत. माणसे जोडण्याची हातोटी, कामातील चिकाटी आणि आर्थिक सचोटी हीच त्यांची तत्त्वप्रणाली होती.

अशी व्यक्तिमत्त्वे समाजात दुर्मिळ असतात. ती आयुष्यभर ध्येयवाद जपत चालतात, स्वतःची वेगळी वाट निर्माण करतात आणि पुढील पिढीसाठी दिपस्तंभ ठरतात. बापू ही केवळ व्यक्ती नव्हे, तर नैतिक मूल्ये जपणारा उत्कट विचार होता, असे आवटे यांनी नमूद केले. बापूंनी अपेक्षित केलेला समाज घडवणे हेच आजचे कर्तव्य असून, शब्दांना मंत्रमय ताकद देत प्रतिभासंपन्न होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. बापूंच्या विचारांची वाटचाल पुढे नेत राजेंद्रदादांनी त्यांच्या जनसेवेच्या कार्याला नवी उंची दिल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

आज शिक्षणासाठी संघर्ष करत मुले-मुली महाविद्यालयापर्यंत पोहोचत आहेत, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. मात्र, परकीय देशांच्या तुलनेत भारतात करिअरच्या विविध संधींबाबत पुरेशी माहिती दिली जात नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले. पूर्वी ‘भारत एक खोज’ सारख्या कार्यक्रमांतून मांडला जाणारा खरा भारत आजच्या पिढीसमोर पुन्हा ठेवण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. विकासाची व्याख्या स्पष्ट करताना त्यांनी, ज्या देशात सार्वजनिक नळाचे पाणी निर्धास्तपणे पिता येते, तोच खरा विकास असल्याचे मत व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराजांची पहिली जयंती महात्मा फुले यांनी साजरी केली होती, हा इतिहास सांगत त्यांनी आधुनिक साधनांचा वापर विवेकबुद्धीने करण्याचा सल्ला तरुणांना दिला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स. म. नागवडे कारखान्याचे संचालक प्रशांतजी दरेकर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बापूंच्या कार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांनी मोबाईल व समाजमाध्यमांचा सुयोग्य वापर करून थोरांचे चरित्र अभ्यासावे, असे आवाहन केले.

बापूंच्या जयंती सप्ताहानिमित्त महाविद्यालयात ‘शेला–पागोटे’ व ‘बॉलिवूड डे’ या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमास नागवडे सहकारी साखर कारखान्याचे संचालक ज्ञानदेव खरात, भाऊसाहेब नेटके, संदीप औटी, प्रा. सुरेश रसाळ, प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, निरीक्षक सचिनराव लगड, माजी संचालक विजय मुथा, निरीक्षक प्रा. बाळासाहेब बळे, ॲड. जयंत शिंदे, पोपटराव बोरुडे, सामाजिक कार्यकर्ते टिळक भोस, पत्रकार दत्तात्रय जगताप, विजय उंडे, कालिदास खेतमाळीस, प्रा. नंदकुमार पवार, डॉ. मिलिंद बेडसे, प्रा. प्रवीण टकले, प्रा. सुनील माने, उपअभियंता सुधाकर नागवडे यांच्यासह अनेक मान्यवर, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शंकर गवते यांनी केले, तर डॉ. प्रमोद परदेशी यांनी

## सिडको येथे आंध्रप्रदेश येथुन आलेल्या साई पालखीचे ढोलताशांच्या गजरात स्वागत

**नवीन नांदेड: (समर्थ गांवकरी)**

आंध्रप्रदेश येलुर येथुन आलेल्या साई पालखीचे सिडको येथील छत्रपती शिवाजी चौक परिसरात ढोलताशांच्या गजरात सहभागी भाविक भक्तांचे स्वागत करून सिडको येथील साईबाबा पालखी सोहळा यांच्या वतीने स्वागत, महाआरती व महाप्रसाद वाटप केले. आंध्रप्रदेश येलुर येथुन 22 डिसेंबर रोजी निघालेली साई पालखी पदयात्रा 17 जानेवारी रोजी सिडको येथे सायंकाळी आगमण झाले जवळपास 45 सहभागी साई भक्त या पालखी सोहळ्यात सहभागी झाले असून 6 फेब्रुवारी रोजी 1050किलोमिटर अंतर पार करून शिर्डी येथे ही यात्रा पोहचणार आहे. सिडको साईबाबा पालखी सोहळा यांच्या वतीने काल सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक सिडको येथे ढोल ताशांच्या गजरात या पालखी सोहळ्याचे स्वागत करून सहभागी साईभक्त यांच्या सत्कार करण्यात आला यावेळी महाआरती व उपस्थित साईभक्त यांच्या साठी महाप्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी गणेश जैस्वाल, रमेश भद्रे, श्रीनिवास श्रीवास्तव, वाघमोडे,राजु बचेवार,सोनु दरबस्तवार,बाळु सुर्यवंशी,सोमेवाड,दता काळे,रवि अष्टुरकर,संदीप देवसरकर यांच्या सह साई भक्त यांनी परिश्रम घेतले, सदरील पदयात्रा सिडको येथे मुक्काम करून 18 जानेवारी रोजी नांदेड शहरातुन पावडेवाडी मार्ग निळा या गावी मुक्काम करणार आहे.




## सावरगाव येथे बछडा पकडला

**शिवनेरी: (समर्थ गांवकरी)**

सावरगाव हिंग मळा येथे शरद हिंगे यांच्या शेतात ऊस तोडणी सुरू असताना एक बिबट्या व दोन बछडे आढळले . यामुळे ऊस तोडणी कामगार , गावात , वाडी वस्ती व परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरून पिंजरा लावण्याची मागणी वनविभाग जुन्नर यांच्याकडे ग्रामस्थांनी केली आहे . या ठिकाणी नागरिकांची गर्दी पाहून बिबट मादी व बछडा पळून गेले . शेतकऱ्यांनी दोन बछडे पकडले . त्यावेळी एक बछडा पळून गेला असल्याचे तुकाराम ढमढेरे यांनी सांगितले. येथील जेरबंद झालेल्या बिबट्याच्या एक बछड्याला वन अधिकारी यांनी माणिकडोह येथील बिबट निवारण केंद्रात घेऊन गेले.

## ‘दैनिक समर्थ गांवकरी’ दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा संपन्न!



**ठाणे: (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक म्हणून ओळख असलेल्या दैनिक समर्थ गांवकरी यांच्या नवीन वर्षाच्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

हा उपक्रम नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, समूह संपादक तथा थोर समाजसेवक यांच्या संकल्पनेतून साकार झाला आहे. ग्रामीण महाराष्ट्राचा आवाज ठामपणे मांडणारे आणि समाजहित जपणारे दैनिक म्हणून दैनिक समर्थ गांवकरी ने अल्पावधीतच राज्यभर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

दिनदर्शिकेचे अधिकृत प्रकाशन संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, “दैनिक समर्थ गांवकरी हे केवळ वृत्तपत्र नसून ग्रामीण जनतेचा विश्वास, प्रश्न आणि भावना मांडणारे व्यासपीठ आहे.

दिनदर्शिका हा त्या बांधिलकीचा एक महत्त्वाचा भाग असून ती समाजोपयोगी माहितीने परिपूर्ण आहे.”

या सोहळ्यास सुभाष विसे (ठाणे जिल्हा प्रतिनिधी, दैनिक समर्थ गांवकरी) तसेच हर्षल सहाने (नामवंत उद्योजक) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी दिनदर्शिकेच्या उपयुक्ततेबद्दल गौरवोद्गार काढत, ही दिनदर्शिका सर्वसामान्य वाचक, शेतकरी, विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

### दिनदर्शिकेची वैशिष्ट्ये

या दिनदर्शिकेत, राष्ट्रीय व राज्यस्तरीय महत्त्वाच्या दिनांकांची माहिती. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संदर्भ. ग्रामीण जीवनाशी संबंधित उपयुक्त टिप्स. प्रेरणादायी विचार व संदेश.

यांचा समावेश करण्यात आला आहे. प्रकाशन सोहळ्यानिमित्त उपस्थितांनी दैनिक समर्थ गांवकरी च्या या उपक्रमाचे कौतुक केले.

ग्रामीण महाराष्ट्राचा आवाज बुलंद करणारे, निर्भीड व जनहिताचे पत्रकारितेचे ध्येय पुढे नेणाऱ्या या दिनदर्शिकेमुळे वाचकांशी नाते अधिक दृढ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## “मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रुप डोहोळे ग्रामपंचायतीत कलाकारांचा नागरिकांशी संवाद”

**भिवंडी: (समर्थ गांवकरी)**

ठाणे जिल्हा परिषदेतर्फे राबविण्यात येणाऱ्या शासनाच्या महत्वाकांक्षी “मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान” अंतर्गत भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे १८ जानेवारी २०२६ रोजी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. गावाच्या सर्वांगिण विकासासाठी नागरिकांशी थेट संवाद साधण्याकरिता महाराष्ट्राचे लाडके कलाकार ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप व अभिनेत्री शिवाली परब तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव उपस्थित होते.



पारंपरिक ढोल-ताशा, लेझीम व तारपा नृत्याच्या सादरीकरणासह वारकरी संप्रदायाने टाळ-मृदंगाच्या गजरात पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान गार्डन बोर्डाचे उद्घाटन, घरकुल गृहप्रवेश, ऑक्सिजन पार्क, “आय लव्ह डोहोळे” गार्डन, ॲम्ब्युलन्स उद्घाटन तसेच वॉटर एटीएमची पाहणी करण्यात आली. अभियानाच्या अनुषंगाने वॉल पेंटिंग व जिल्हा परिषद शाळांची पाहणीसुद्धा करण्यात आली. यावेळी स्वयं-सहायता बचतगटांचे स्टॉल लावण्यात आले होते.

डोहोळेपाडा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले तर चिंबीपाडा शाळेतील विद्यार्थ्यांनी “महिला सुरक्षा – काळाची गरज” या सामाजिक विषयावरील पथनाट्य सादर केले. “चला एकत्र येऊया, डोहोळे ग्रामपंचायतीला आणि त्यात समाविष्ट गावांना समृद्ध बनवूया” असा सामूहिक संकल्पही नागरिकांनी केला.

या कार्यक्रमास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक छायादेवी सिसोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, कार्यकारी अभियंता प्रकाश सासे, सहाय्यक गटविकास अधिकारी पंडित राठोड, गटविकास अधिकारी गोविंद खामकर, विस्तार अधिकारी सुधाकर सोनावणे व जनसंपर्क अधिकारी रेश्मा आरोटे तर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

कार्यक्रम यशस्वी करण्यात सरपंच सुमन वाघे, उपसरपंच सचिन घोडविंदे, लिपिक एकनाथ जाधव तसेच ग्रुप ग्रामपंचायत सदस्य व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.

## महात्मा फुले विद्यालयाचे रेखाकला परीक्षेत यश

**अकोले: (समर्थ गांवकरी)**

श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटीचे महात्मा फुले विद्यालय सुगांव बु विद्यालयातील शासकीय रेखाकला परीक्षेचा सन 2025-26 इलेमेंटरी व इंटरमीजीएट चा निकाल अत्यंत समाधानकारक लागला असून इंटरमिजीएट या परीक्षेचा निकाल 100 टक्के इतका असल्याने याही वर्षी निकालाची परंपरा कायम ठेवण्यात यश आले आहे. दरवर्षी महाराष्ट्र शासन यांचे मार्फत शालेय स्तरावर या परिक्षांचे आयोजन करण्यात येत असते व विद्यालयातील विद्यार्थी मोठया संख्येने त्यात सहभागी होत असतात. विद्यालयाच्या दोन मुली अनुक्रमे शिंदे सेजल सोपान, देशमुख श्रावणी संजय यांनी या परीक्षेत अ श्रेणी मिळवत शाळेच्या यशाचा वाढता आलेख कायम ठेवण्यात यश मिळवले आहे.

## कोतूळ येथील प्राचीन जागृत श्री वरदविनायक देवस्थानात गणेश जयंतीचे आयोजन

**अकोले: (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील कोतूळ येथील प्राचीन व जागृत श्री वरदविनायक देवस्थानात माघ शुद्ध चतुर्थी अर्थात श्री गणेश जयंतीचा उत्सव गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ रोजी भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. इच्छित मनोकामना पूर्ण करणारे म्हणून प्रसिद्ध असलेल्या या देवस्थानात दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



उत्सवाची सुरुवात पहाटे ५ वाजता सनई वादन व भूपाळीने होणार असून सकाळी ८ वाजता श्रींना महाअभिषेक व चांदीची आभूषणे अर्पण करण्यात येणार आहेत. सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत श्री गणेश यागाचे आयोजन करण्यात आले असून या यागाचे पौरोहित्य वेदमूर्ती श्री. भाऊ जाखडी (संगमनेर) करणार आहेत.

सायंकाळी ४.३० वाजता श्रींचा भव्य पालखी सोहळा संपन्न होणार आहे. सायंकाळी ७ वाजता राष्ट्रीय कीर्तनकार, हिंदूधर्म भूषण ह.भ.प. एकनाथ महाराज सदगीर (ठाणे), जिल्हाध्यक्ष विश्व हिंदू परिषद ठाणे यांचे जाहीर हरीकीर्तन होणार आहे.

रात्री ९ वाजता महाआरतीचा सोहळा पार पडणार असून हा कार्यक्रम सौ. सिमांतिनी व श्री. मोहन बोरसे साहेब (पोलीस निरीक्षक, अकोले) यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. त्यानंतर रात्री ९.३० वाजता श्री दत्त मंदिर प्रांगण, कोतूळ येथे भंडारा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री १० वाजता कोतूळ परिसरातील सर्व भजनी मंडळांचे भजन कार्यक्रम होणार आहेत.

या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी सर्व गणेश भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन श्री वरदविनायक देवस्थान व जय भवानी संस्कृती संवर्धन मंडळ, कोतूळ यांच्या वतीने प्रदीप भाटे, विनय समुद्र, संभाजी पोखरकर, कुलदीप नेवासकर, वासुदेव साळुंके, सुभाष घाटकर, अनिल पाठक,संतोष नेवासकर, विशाल बोऱ्हाडे, सचिन पाटील, अजित आरोटे, सागर सोनुले आदींनी केले आहे.

## आज राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन

**नांदेड: (समर्थ गांवकरी)**

स्वातंत्र्यसैनिक गोविंदरावजी धर्माधिकारी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित ८ वे राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलन सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ रोजी बरडवा (ता. नायगाव, जि. नांदेड) येथे मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या साहित्य संमेलनाचे आयोजन स्वातंत्र्यसैनिक गोविंदरावजी धर्माधिकारी सार्वजनिक वाचनालय, बरबडा यांच्या वतीने करण्यात आले असून, संमेलनाचे नियोजन सदाशिवराव धर्माधिकारी, दिलीपराव धर्माधिकारी, व्ही. टी. सूर्येवाड व सुदर्शन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. या राज्यस्तरीय साहित्य संमेलनातील कथाकथन सत्राच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध कथाकार मा. आप्पासाहेब यशवंतराव खोते विराजमान राहणार असून, ग्रामीण कथाकार मा. ज्योतिराम फडतरे यांची प्रमुख सहभागिता राहील. या सत्राचा परिचय मा. राम तरटे करून देतील, तर सूत्रसंचालन प्रा. पंढरीनाथ मुंडे करणार आहेत. संमेलनातील कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध कवी बालाजी पेटकर खतगावकर असणार असून, गणपत माखणे यांचा सहभाग लाभणार आहे. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन आत्माराम राजोरे व गोविंद काकडे करणार आहेत. या संमेलनात महाराष्ट्रातील विविध भागांतून नामवंत साहित्यिक, कवी, लेखक, समीक्षक, प्राध्यापक तसेच ग्रामीण साहित्य चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. कथाकथन, कविसंमेलन, साहित्यिक चर्चासत्रे व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मराठी ग्रामीण साहित्याची समृद्ध परंपरा अधोरेखित केली जाणार आहे.

## चांडगव येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचा उत्साहात समारोप

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने चांडगव येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दि. ७ ते १३ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडला.



समारोप समारंभ मा. आ. राहुल दादा जगताप पाटील (सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा) यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी मा. बबनरावजी पाचपुते (माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच मा. राजेंद्र आबा मस्के (सदस्य, सल्लागार समिती, रयत शिक्षण संस्था – उत्तर विभाग) व श्री. अनिल म्हस्के (चेअरमन, चंडेश्वर सोसायटी) यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना मा. बबनरावजी पाचपुते यांनी महाविद्यालयीन जीवनात श्रम व प्रतिष्ठेचे महत्त्व अधोरेखित केले. तर मा. आ. राहुल दादा जगताप पाटील यांनी श्रमसंस्कार ही काळाची गरज असून शाश्वत विकासासाठी युवकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. विद्यापीठाने यंदा ‘पाणलोट व पडीक जमीन व्यवस्थापन’ ही थीम निवडल्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

सरपंच मनिषा रविंद्र म्हस्के यांनी स्वयंसेवकांनी गाव स्वच्छतेसाठी केलेल्या कार्याचे कौतुक करून स्वच्छतेचा संदेश प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे यांनी केले. शिबिर यशस्वी होण्यासाठी सहकार्य केलेल्या ग्रामस्थांचे त्यांनी आभार मानले. शिबिरातील विविध उपक्रमांचा सविस्तर अहवाल राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. भाऊ बुलाखे यांनी सादर केला. आभार प्रदर्शन प्रा. देवेंद्र बहिराम यांनी केले.

शिबिरकाळात सौ. संगीता भोंग, श्री. संदीप बोदगे (कृषी अधिकारी), प्रा. राम सोनवणे, श्री. संतोष शामराव परदेशी, डॉ. अरुण रोडे आदी तज्ज्ञांची व्याख्याने झाली. तसेच स्मशानभूमी स्वच्छता, ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, वनराई बंधारा, बसस्थानक स्वच्छता व गाव सर्वेक्षण अशी विविध उपक्रम राबविण्यात आले.

उल्लेखनीय कार्याबद्दल ग्रामपंचायत चांडगव यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. देवेंद्र बहिराम व प्रा. भाऊ बुलाखे यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. शिबिराअंतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या दोन आदर्श स्वयंसेवकांचाही विशेष सन्मान करण्यात आला. श्री. रविंद्र म्हस्के यांनी स्वयंसेवकांच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमास उपसरपंच दादा राऊ रसाळ, अनिल रघुनाथ म्हस्के, चेअरमन प्रकाश घोडके, पोलीस पाटील रविंद्र कांतीलाल म्हस्के, तुकाराम चाकणे, अरविंद भालेकर, डॉ. हंबीराव म्हस्के, रमेश रसाळ, विनायक रसाळ, रोहिदास म्हस्के, सोमनाथ म्हस्के, हनुमंतराव रसाळ आदी ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, विज्ञान विभाग प्रमुख डॉ. नितीन थोरात, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुदाम भुजबळ, ज्युनिअर कॉलेज पर्यवेक्षक श्री. रत्नाकर झिटे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रियंका म्हस्के व सोनाली रायकर यांनी केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना सदस्य श्रीमती प्राजक्ता वारे, श्रीमती सुप्रिया पवार, प्रा. बर्वे एस. बी. व प्रा. डॉ. रावसाहेब काळे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ संपन्न

**राजूर: (समर्थ गांवकरी)**



आदिवासी समाज कृती समिती महाराष्ट्र, शाखा अकोले व माजी विद्यार्थी आश्रम शाळा मवेशी यांचे संयुक्त विद्यमाने ॲड. देशमुख महाविद्यालय राजूर येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व सरळ सेवा महाराष्ट्र शासन परीक्षेत उत्तीर्ण झालेले गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष चिंधु भांगरे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा.नितीन तळपाडे, (सिनेट सदस्य सोलापूर) प्रा डॉ.विजय हीले, तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार डॉ. किरण लहामटे , आदिवासी समाजसेवक रामनाथ भोजने, निवृत्त मुख्याध्यापक बी.के घोडे यांचे उपस्थित पार पडला. यावेळी प्रा नितीन तळपाडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की आजच्या आधुनिक , स्पर्धात्मक आदिवासी विद्यार्थी एम.पी.एस.सी द्वारे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये उत्तुंग यश संपादन करत आहेत ही अतिशय अभिमानास्पद गोष्ट आहे. या विद्यार्थ्यांनी आपल्या मिळालेल्या संधीचे सोने करून, समाजहित डोळ्यासमोर ठेवून आपला पुढचा प्रवास करावा व येणाऱ्या पिढीला योग्य मार्गदर्शन करावे. तर आ.लहामटे यांनी आदिवासी समाज जगातील सर्वात जुना असून त्यांना मूळ निवासी समजले जाते . तसेच सहनशील आणि तेव्हढाच प्रामाणिक आहे. जिद्द व चिकाटी असल्यास कोणत्याही शाखेत प्रवेश मिळाला तरी संधीच सोनं करता येत . स्पर्धा परीक्षेची तयारी दहावी पासूनच तयारी करावी असेही म्हटले . यावेळी आ. किरण लहामटे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी सचिव रमेश हीले कार्याध्यक्ष कोंडीराम पोपेरे, नामदेव भांगरे,शिवराम भांडकोळी, विठ्ठल जोशी, बाजीराव वाळेकर यमाजी भांगरे ,सौ .सिंधू भांगरे, रामभाऊ रोंगटे, निंबा भांगरे सह सर्व पदाधिकारी परिश्रम घेतले . प्रस्ताविक निवृत्त मुख्याध्यापक बी.के घोडे यांनी केले तर सूत्रसंचालन समाजसेवक भास्कराव येलमामे. यांनी केले. आभार कृती समितीचे अध्यक्ष चिंधु भांगरे यांनी यांनी मानले.



## वाढदिवसाचे औचित्य साधत डॉ. सुधिर तांबे यांचा डॉ. विश्वासराव आरोटे यांच्यावतीने सत्कार!

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिक पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. सुधिर तांबे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा शाल, पुष्पगुच्छ व घड्याळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी डॉ. तांबे पाटील यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी व्यवस्थापक संजय फुलसुंदर हेही उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी डॉ. सुधिर तांबे पाटील यांच्या सामाजिक, शैक्षणिक व सार्वजनिक जीवनातील कार्याचा गौरव करत त्यांच्या आरोग्यदायी व यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

वाढदिवसाच्या या सत्कार सोहळ्यात सौहार्दपूर्ण वातावरणात शुभेच्छांचा आदान-प्रदान करण्यात आला.

## विरगाव परिसरात बिबट्या पिंजऱ्यात अडकला

■ वनविभागाची तत्काळ कारवाई, नागरिकांत भीती!

**विरगाव : (समर्थ गांवकरी)**



विरगाव व परिसरात गेल्या काही दिवसांपासून दहशत निर्माण करणारा बिबट्या अखेर काल रात्री (दि. १८ जानेवारी २०२६) सायंकाळी सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास पिंजऱ्यात अडकला. शेतकरी भरत वाकचौरे व शेजारी राहणारे ज्ञानेश्वर वाकचौरे यांनी ही बाब तातडीने वन कर्मचारी बाळासाहेब थोरात यांना कळविली.

बिबट्या पकडल्याची बातमी पसरताच, हाच तो अनेक दिवसांपासून विरगाव व परिसरात दहशत माजवणारा बिबट्या आहे की काय, हे पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. संभाव्य धोका लक्षात घेता वन कर्मचारी बाळासाहेब थोरात यांनी तात्काळ गर्दीवर नियंत्रण मिळवत सुरक्षिततेच्या दृष्टीने बिबट्याला पिंजऱ्यासहित देवठाण येथील वनविभाग नर्सरीमध्ये हलविले. दरम्यान, विरगाव व आसपासच्या परिसरात बिबट्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे चित्र आहे. सध्या ऊस तोडणीचा हंगाम सुरू असल्याने ऊसाचे क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे बिबटे आता मोकळ्या शेतात व वस्तीच्या जवळ फिरताना दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या पकडलेल्या बिबट्याशिवाय आणखी काही बिबटे परिसरात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वनविभागाने बिबट्यांना पकडण्यासाठी व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पुरेशा आणि प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी अन्नासाहेब थोरात यांनी केली आहे. वनविभागाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात असून नागरिकांनी अफवा पसरवू नयेत व वन अधिकाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संजय पा. चव्हाण व अविनाश पा. कल्याण यांचा भाजपमध्ये प्रवेश

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नायगाव शहराध्यक्ष संजय तेजराव पाटील चव्हाण व या समावेत अविनाश पांडुरंग पाटील कल्याण यांचा नुकताच नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.राजेश पवार यांच्या उपस्थितीमध्ये त्यांच्या कार्यालयात भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश घेतला असून याप्रसंगी आ.राजेश पवार यांनी या दोघांचेही सत्कार करून अभिनंदन करीत शुभेच्छा दिले.तसे पाहिले तर संजय पाटील चव्हाण हे यापूर्वी भारतीय जनता पार्टीत सक्रिय आणि निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून होते परंतु अंतर्गत गटबाजी मुळे त्यांनी नाराजी व्यक्त करीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात नायगाव शहराध्यक्ष म्हणून आपल्या कामाचा त्यांनी ठसा उमटविला भाजपामधील अनेकांना वाटत होते.

## मुरबाडच्या खेवारे ग्रामपंचायतीचा स्पर्धेत सहभाग!

**मुरबाड|ठाणे: (समर्थ गांवकरी)**



राज्यातील ग्रामपंचायतींच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत खेवारे ग्रामपंचायतीचा स्पर्धेत सहभाग नोंदविण्यात आला आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामपंचायतींचा कारभार अधिक पारदर्शक, लोकाभिमुख व परिणामकारक करणे हा असून स्वच्छता, पाणीपुरवठा, डिजिटल सेवा, महिला सक्षमीकरण, कृषी विकास तसेच शाश्वत विकासाशी संबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे हे शासनाचे प्राधान्य आहे.

या अभियानाच्या जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असून, याबाबत माहिती देताना डॉ. लता गायकवाड (गटविकास अधिकारी, पंचायत समिती मुरबाड), लक्ष्मण सुरोशे (विस्तार अधिकारी, पंचायत), श्रीमती नाडेकर (सरपंच, ग्रामपंचायत खेवारे), अंकुश सुरोशे (उपसरपंच), पोलिस पाटील तसेच शेतीतज्ज्ञ डॉ. विलास सुरोशे यांनी संयुक्तपणे भूमिका मांडली. यावेळी बोलताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानामुळे ग्रामपंचायतींच्या प्रशासनात लक्षणीय सुधारणा होऊन विकासकामांना वेग मिळणार आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग व लोकसहभाग हा या अभियानाच्या यशाचा मुख्य आधार असून, ग्रामविकास प्रक्रियेत युवक व महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित सेलिब्रिटी ग्रामस्थांशी थेट संवाद साधून अभियानाची उद्दिष्टे, ग्रामविकासातील नागरिकांची जबाबदारी तसेच युवक व महिलांचा सहभाग याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमास ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

## रुपाली निकुळे, मंगला नन्नावरे, संध्या कुलकर्णी, चंद्रकांत खोडे विजयी

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**




### प्रभाग 23 मध्ये भाजपाचे वर्चस्व

माजी महापौर सतीश नाना कुलकर्णी यांच्या प्रभाग 23 मध्ये पुन्हा कमळ फुलले आहे. माजी महापौर सतिष नाना कुलकर्णी यांच्या कन्या संध्या कुलकर्णी यांनी मोठे यश संपादन करत विजय मिळवला आहे. तर माजी नगरसेवक यशवंत निकुळे यांच्या पत्नी रूपाली यशवंत निकुळे यांनी सलग दुसऱ्या टर्म मध्ये मोठे यश संपादन करत विजय मिळवला आहे. नव्यानेच निवडणूक लढलेल्या नागरिकांचा मागास प्रवर्गब गटातून मंगला प्रकाश नन्नावरे यांनी अतितटीच्या लढतीत विजय संपादन केला आहे. तर या प्रभागात सर्वांचे लक्ष लागून असलेल्या सर्वसाधारण गट ड मधून भाजपचे चंद्रकात खोडे व शिंदे गटाचे योगेश म्हस्के यांच्यात बिग लढती मध्ये चंद्रकात खोडे विजयी झाले. अनुसूचित जमाती महिला अ मधून रूपाली निकुले भाजप यांना १३०४४ मते पडली. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या शारदा सुभाष चव्हाण यांना ७०९६ मते पडली. यात ५९४८ मतांनी रूपाली निकुळे विजयी झाल्या आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला ब यातून मंगला नन्नावरे भाजप यांना ८६२६ मते पडली. शिवसेना शिंदे गटाच्या अश्विनी जयेश आमले यांना ७५२२ मते पडली.यात ११०४ मतांनी भाजप उमेदवार मंगला नन्नावरे विजयी झाल्या. सर्वसाधारण क गटातून भाजप च्या संध्या अभिजीत कुलकर्णी यांना १३६३८ मते पडली. उबाठा शिवसेना उमेदवार बल सरप्रीतसिंग यांना ६७२५ मते पडली.६९१३ मतांनी संध्या कुलकर्णी भाजप उमेदवार विजयी झाल्या. ड सर्वसाधारण जागेसाठी चंद्रकांत कारभारी खोडे भाजप ९१२४ यांना मते पडली.तर शिवसेनेचे शिंदसेना गटाचे योगेश लक्ष्मण म्हस्के यांना ७५३३ मते पडली . १५९१ मतांनी चंद्रकांत कारभारी खोडे विजयी झाले. ह्या विजयात आमदार देवयांनी फरांदे, प्रा सुहास फरांदे, माजी महापौर सतिष कुलकर्णी, माजी नगरसेवक यशवंत निकुळे, प्रकाश नन्नावरे ,वैभव कुलकर्णी ,राहुल नन्नावरे, सचिन नन्नावरे,मुझमिल मिर्झा आदी सह भाजप पदाधिकारी कार्यकर्ते यांनी विशेष प्रयत्न केले.प्रभाग २३ मध्ये ठिक ठिकाणी विजय उत्सव साजरा करण्यात आला.

## नाशकात कमळ फुलले

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ७२ जागा जिंकत मनपा वर एकहाती सत्ता मिळवली आहे. सलग दुसऱ्यांदा एकहाती सत्ता मिळवण्याची किमया साधली आहे. या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) २६, शिवसेना (उबाठा) १५, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ४, काँग्रेस ३, मनसे १ तर अपक्ष १ उमेदवार विजयी झाले आहेत. महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपविरोधात नकारात्मक वातावरण निर्माण करण्यात आले होते. त्यामुळे पक्षासमोर मोठ्या अडचणी उभ्या राहतील, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र या आव्हानांना सामोरे जात भाजपने सत्ता मिळवली. भाजपचे तिन्ही आमदार याच्या संह पदाधिकाऱ्यांनी जोमाने काम करत पक्षाला मोठे यश मिळवून दिले.

## मॉडर्न ज्यु. कॉलेजच्या रा. से. यो. च्या हिवाळी शिबिरास आमदार डॉ.किरण लहामटे यांनी दिली सदिच्छा भेट

**राजूर: (समर्थ गांवकरी)**



हिंद सेवा मंडळ, अहिल्यानगर संचलित, मॉडर्न हायस्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स , सोमचंद शहा कॉमर्स व भास्करराव कदम गुरुजी सायन्स कॉलेज अकोले येथील राष्ट्रीय सेवा योजना (+२स्तर)विशेष हिवाळी शिबिर तालुक्यातील डोंगराळ भाग म्हणून ओळख असलेल्या शेरणखेल येथे संपन्न होत आहे. याप्रसंगी अकोले तालुक्याचे विद्यमान आमदार डॉ. किरण लहामटे साहेब यांनी दिली शिबिरास सदिच्छा भेट. याप्रसंगी शेरणखेल गावातील केलेल्या ग्रामस्वच्छता व भवानी माता मंदिर परिसर सुशोभीकरण, रंगरेगोटी, स्मशानभूमी परिसर सुशोभीकरण तथा गावात ठिकठिकाणी २५० केशर आंबा रोपांची लागवड केली .या कामांनिमित्त आमदार लहामटे साहेबांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थींचे व मार्गदर्शक प्राध्यापकांचे कौतुक केले. स्वयंसेवकांशी संवाद साधताना त्यांनी व्यसनापासून दूर राहण्याचा सल्ला दिला."श्रमसंस्कार शिबिरातूनच राष्ट्रउभारणी करणारी पिढी तयार होत असते"असे प्रतिपादन त्यांनी केले.तर मुख्य कार्यक्रम अधिकारी संपत वाळके तसेच सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कोल्हे एम.जी.,प्रा. केदार भिंगारदिवे व प्रा. ऋषिकेश नगरकर यांच्या कामाच्या नियोजनाचे , स्वयंसेवकांची शिस्त व कामातील चिकाटी यांचे भरभरून कौतुक केले.याप्रसंगी ज्युनि. कॉलेजचे उपप्राचार्य दीपक जोंधळे,शेरणखेल गावचे सरपंच दीपक पथवे,रामदास कासार,प्रा.बबन कासार, प्रकाश कासार, गणेश कोकणे यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## विजय महायुतीचा विजय लोकशक्तीचा - दर्शना म्हात्रे, नगरसेविका.

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



ठाणे महापालिका निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या नगरसेवकांमध्ये सौ. दर्शना चरणदास म्हात्रे या 18 हजार 268 मताधिक्य मिळवून शिवसेनेच्या दिवा प्रभाग क्र. 28 मधून निवडून आल्या असून त्यांचा प्रभागात 11,962 या विक्रमी मताच्या आघाडीने दणदणीत विजय झाला आहे त्यांना मिळालेल्या मताधिक्य हे ठाणे महापालिकेच्या दिवा प्रभागात सर्वाधिक आघाडी मिळवली आहे अशी चर्चा सर्वत्र होत आहे. प्रभागात निवडणुकीच्या धामधूमीत शिवसेना विभागप्रमुख व पती चरणदास म्हात्रे यांच्या आईचे निधन झाले असताना हा धक्का पचवून त्यांनी प्रचारात आपली भूमिका निभावून जनतेसाठी त्या पुन्हा मैदानात उतरल्या व विजय खेचून आणला आहे. प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी यांचे नेतृत्व लाभले असल्याचे नगरसेविका दर्शना चरणदास म्हात्रे म्हणाल्या आहेत. ठाणे महापालिका सार्वत्रिक निवडणूकित २०१७ मध्ये शिवसेनेतून प्रचंड बहुमताने निवडून आल्यावर नगरसेविका दर्शना चरणदास म्हात्रे यांनी आपल्या प्रभागात अनेक विकास कामे केली. यंदाच्या ठाणे महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत त्या प्रभाग क्रं. २८ मधून पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यास त्यांना पुन्हा संधी मिळाली होती.

# प्राथमिक आरोग्य केंद्र पडघा येथे आयुक्तांची भेट

**जिल्हा परिषद, ठाणे : (समर्थ गांवकरी)**




अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०२६ रोजी आयुक्त डॉ. कादंबरी बालकवडे यांनी डायरेक्टर हेल्थ सर्विसेस डॉ. नितीन अंबाडेकर यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्र, पडघा, ता. भिवंडी येथे भेट दिली. या भेटीदरम्यान जिल्हा आरोग्य यंत्रणेच्या कामकाजाची सखोल पाहणी करण्यात आली.

या प्रसंगी डॉ. नांदापूरकर (उपसंचालक), जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी डॉ. स्वाती पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार आदी मान्यवर उपस्थित होते.

भेटीच्या सुरुवातीस आयुक्त डॉ. कादंबरी बालकवडे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राची संपूर्ण पाहणी केली. यावेळी त्यांनी E-Sushrut, E-Aushadhi, E-Vin यांसारख्या डिजिटल पोर्टल्सचा प्रत्यक्ष वापर होत आहे की नाही, याची खातरजमा केली. प्रयोगशाळेमध्ये करण्यात येणाऱ्या विविध चाचण्या, त्यांचे कामाचे प्रमाण तसेच संबंधित नोंदी तपासून आरोग्य सेवांच्या गुणवत्तेची पडताळणी करण्यात आली. यानंतर आयुक्त डॉ. कादंबरी बालकवडे व डायरेक्टर हेल्थ सर्विसेस डॉ. नितीन अंबाडेकर यांनी उपस्थित अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत प्राथमिक आरोग्य केंद्र पडघा अंतर्गत उपकेंद्र स्तरावर सुरू असलेल्या अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाची अंमलबजावणी कशा प्रकारे केली जात आहे, याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच उपकेंद्र पातळीवर दिल्या जाणाऱ्या १३ आरोग्य सेवांची गुणवत्ता व कार्यक्षमता तपासण्यात आली. यावेळी डायरेक्टर हेल्थ सर्विसेस डॉ. नितीन अंबाडेकर यांनी नागरिकांना अधिक प्रभावी, वेळेवर आणि दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना व कार्यपद्धती याबाबत आरोग्य कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे सेवा देताना येणाऱ्या अडचणी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून जाणून घेऊन त्यावर योग्य तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले. अनेक प्रशासकीय बाबींवरही यावेळी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या दौऱ्यादरम्यान तालुका आरोग्य अधिकारी (पं. स. भिवंडी) डॉ. नलिनी यशवंत ठोंबरे, प्राथमिक आरोग्य केंद्र पडघाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रज्ञेश पाटील, डॉ. निखील जोगळेकर, डॉ. साक्षी बुलबुले तसेच सर्व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. या सर्वांनी दौरा कार्यक्रमाच्या अनुषंगाने योग्य नियोजन करून बैठकीत माहितीचे उत्कृष्ट सादरीकरण केले.अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाच्या माध्यमातून सिकलसेल आजाराचे लवकर निदान, प्रभावी उपचार व जनजागृती यावर भर देण्यात येत असून, अशा प्रत्यक्ष भेटी व आढावा दौऱ्यांमुळे अभियान अधिक सक्षमपणे राबविण्यास बळ मिळत असल्याचे यावेळी प्रशासनाच्या वतीने नमूद करण्यात आले.